


# श्री साईलीला

या अंकांत—


- बाबांची लीला
- शिर्डींतील रामनवमी महोत्सव
- संसाराकडून विठ्ठलाकडे
- श्रीसाईगाथामृत
- श्रीदास गणूमहाराज आणि कान्ह्या भिल्ल
- श्रीसाईबाबांची भूपाळी
- सुश्लोकगीता
- —दे चरणीं थारा
- श्रीज्ञानेश्वर-जीवन
- एका म्हातारीचें महत्कार्य

इ. इ.





# श्री साई लीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत त्रैमासिक ]

**वर्ष ३४ वें : अंक २ रा**

वार्षिक वर्गणी रु. २-४-० (ट. ख. सह)

एप्रिल—मे—जून १९५७

संपादक—

**नागेश आत्माराम सावंत**
**रामचंद्र महादेव राणे**

कार्यालय—

**ईस्ट ॲण्ड वेस्ट इं. कं. बिल्डिंग,**
**४९/५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुं. १**


## श्री साईवाक्सुधा



★

पाप जयांचें विलया गेलें ।
ऐसे जे पुण्यात्मे वहिले ।
तेच माझे भजनीं लागले ।
खूण लाधले ते माझी ॥ ११ ॥
साई साई नित्य म्हणाल ।
सात समुद्र करीन न्याहाल ।
या बोला विश्वास ठेवाल ।
पावाल कल्याण निश्चयें ॥ १२ ॥

—श्री साईसच्चरित अ. १२



# प्रिय वाचक—

श्रीसाईलीलेचा चालू अंक हा एप्रिल मे–जूनचा अंक आहे. याच्या आधींचा अंक हा जानेवरी–फेब्रुवारी–मार्च या तिमाहीचा अंक होता. तिमाही संपल्यानंतर येणाऱ्या महिन्याच्या एक तारखेला अंक प्रसिद्ध होतो. यामुळें गेल्या वर्षी आम्ही त्या महिन्याचें नांव अंकाच्या मुखपृष्ठावर घालण्याचा उपक्रम सुरू केला होता. पण यामुळें आमच्या कांहीं वर्गणीदारांचा घोंटाळा होतो असें आढळून आलें आहे! आक्टोंबर–नोव्हेंबर–डिसेंबरच्या अंकाच्या मुखपृष्ठावर 'जानेवारी १९५७' असें लिहिल्यामुळें कांहीं वर्गणीदारांचीं आम्हांला पत्रें आलीं कीं, 'आम्हांला जानेवारीचा अंक मिळाला पण आधींचा डिसेंबरचा अंक कोठें आहे?' हा घोंटाळा टाळावा म्हणून चालू अंकापासून आम्ही पूर्वींची प्रथा चालू केली आहे. ज्या तिमाहीचा अंक अंक असेल त्या तीन महिन्यांचीं नांवें अंकाच्या मुखपृष्ठावर देण्यांत येतील; म्हणजे वाचकांचा गैरसमज होणार नाहीं.

## वाचकांना आवाहन

चालू अंकापासून एक मनोवेधक सत्य-कथा–माला आम्ही सुरू करीत आहोंत. संतांचीं चरित्रें वाचतांना पुष्कळदां कल्पितापेक्षांहि अद्‌भुत असे प्रसंग त्यांच्या जीवनांत घडलेले आढळून येतात. अशा प्रसंगांच्या सत्य–कथा देण्याचें आम्ही योजलें आहे. या अंकांत, श्रीदासगणू महाराज हे नोकरींत असतांना एका क्रूर भिल्ल दरोडेखोराचा शोध लावण्याच्या कामीं त्यांच्यावर कोणकोणते प्रसंग आले, याचें एखाद्या कादंबरीपेक्षांहि सुरस वर्णन आम्ही देत आहोंत.

तत्त्वज्ञानाच्या केवळ शुष्क चर्चेपेक्षां, गोष्टी सांगत सांगत आपल्या जीवनांतील अनेक प्रश्नांना उत्तरें देण्याच्या पद्धतीचा साईलीलेंत अवलंब केलेला आहे, असें वाचकांना आढळून येईल. साधुसंतांच्या आणि देवादिकांच्या गोष्टी, उद्‌बोधक आख्यायिका, संस्मरणीय वचनें, बोधपर सुलभ लेख, इत्यादींनीं साईलीलेचा प्रत्येक अंक हा वाचनीय, मननीय व संग्राह्य असा व्हावा यासाठीं आम्ही आमच्याकडून सतत कसोशी करीत आहोंत. गेल्या कांहीं वर्षांत ठराविक तारखेला वाचकांच्या हातीं अंक पडेल अशी दक्षताहि आम्ही घेतलेली आहे. अंक अधिकाधिक आकर्षक आणि अधिकाधिक संग्राह्य करण्याची आमची मनीषा आहे. यासाठीं वाचकांचें साहाय्य आम्हांला हवें आहे. सध्यां साईलीलेचे जे वर्गणीदार आहेत त्यांनीं प्रत्येकानें एक आणखी वर्गणीदार साईलीलेला मिळवून द्यावा अशी आमची कळकळीची विनंती आहे. हें त्रैमासिक शिरडीच्या साईबाबा संस्थानच्या वतीनें निघतें. त्रैमासिकासाठीं संस्थानकडून ठराविक आर्थिक साहाय्यहि होतें. परंतु हें त्रैमासिक आहे याच किंमतींत अधिक

पृष्ठांचें आणि भरगच्च मजकुराचें असें द्यावें अशी आमची तळमळ आहे. हें त्रैमासिक खर्चाच्या दृष्टीनें आपल्या पायांवर उभें राहूं शकलें तर आमची ही इच्छा पुरी करतां येईल आणि वाचकांची अधिक सेवा आमच्या हातून घडेल. यासाठीं आम्ही वाचकांना हें आवाहन करीत आहोंत. प्रत्येक वर्गणीदारानें आपल्या आप्तमित्रांना सांगून किमान एक वर्गणीदार मिळवून द्यावा. आमच्या या विनंतीचा अव्हेर होणार नाहीं अशी आम्हांला खात्री आहे.

## शिरडी क्षेत्रांतील व्यवस्थेबाबत—

शिरडी क्षेत्राचें माहात्म्य प्रतिदिन वाढत असल्यामुळें लोकांचें शिरडी-बद्दलचें कुतूहल वाढावें आणि शिरडी-संबंधीं विविध दृष्टिकोणांतून विविध लोकांनीं बोलावें व लिहावें हें हें स्वाभाविकच आहे. नव्या लोकसभेच्या गेल्या अधिवेशनांत तर एका खासदाराच्या शपथविधीच्या वेळीं त्यानें " ईश्वर आणि सद्गुरु श्रीसाईबाबा यांना स्मरून " अशी शपथ घेतल्यामुळें एक दिवस भारतांत साईबाबांचें नांव सर्वतोमुखी झालें. अशा परिस्थितींत शिरडीकडे अधिकाधिक लोकांचें लक्ष वेधावें आणि तेथील वातावरणाबद्दल अधिकाधिक चर्चा व्हावी हें युक्तच आहे.

या चर्चेंत प्रशंसे बरोबर टीकेचे उद्गारही निघतात. शिरडीला येणाऱ्या भक्तांची व्यवस्था नीट व्हावी आणि बाबांचें पूजन त्यांना निर्वेधपणें घेतां यावें यासाठीं येथें अनेक सोयी संस्थाननें केल्या आहेत. या सोयी सर्वांगपरिपूर्ण आहेतच असें कोणी म्हणत नाहीं सुधारणेला पुष्कळ वाव आहे असेंच व्यवस्थापक मंडळ मानतें. पण पुष्कळदां सोयी याच गैरसोयी आहेत अशी टीका केली जाते हें पाहून सखेद आश्चर्य वाटतें.

नमुन्यादाखल आज एकाच गोष्टीचा उल्लेख करतों. शिरडीला येणाऱ्या अनेक भक्तांना समाधिस्थळीं एकादशणी लघुरुद्र महारुद्र, वगैरे पूजाविधी करण्याची इच्छा असते. अशा भक्तांची संख्या कधीं कधीं एकाच दिवशीं पन्नास शंभरहि असते. आतां या बाबतींत कांहींच नियम लावून दिला नाहीं, कसलीच शिस्त ठेवली नाहीं, तर काय होईल? मंदिरांत पूजोत्सुक भक्तांची गर्दी होईल. प्रत्येकाला आपण पूजा प्रथम आटोपावी असें स्वाभाविक वाटत असतें. या इच्छेमुळें पूजास्थानीं सर्वांचीच झुंबड उडेल आणि कोणालाच शांत व स्वस्थ चित्तानें पूजा करतां येणार नाहीं. या गर्दींत एखादा भक्त सकाळीं सहा वाजतां मंदिरांत येऊनहि त्याला बारा वाजेपर्यंत ताटकळत गर्दी ओसरण्याची वाट पाहावी लागेल, तर एखादा तामसी भक्त सर्वांत मागाहून येऊन सर्वांच्या आधीं पूजा करण्याची संधी साधून घेईल. असें घडूं नये आणि सर्वांची वाजवी सोय व्हावी म्हणून संस्थाननें एक नियम केला आहे. तो असा कीं समजा कोणाला लघुरुद्र करायचा असेल तर त्यानें संस्थानच्या कचेरींत या विधीला ठरविलेले पैसे भरावे, पावती घ्यावी व मंदिरांत जाऊन रांगेंत बसावें. त्याची पाळी येईल तेव्हां तो भक्त पावती दाखवितो आणि सर्व

पूजाकर्म यथासांग करतो. कचेरींत भरलेल्या पैशाखेरीज त्याला दक्षिणा वगैरेसाठीं ब्राह्मणांना निराळे पैसे द्यावे लागत नाहींत. पूजा करण्याची सर्वांची इच्छा या पद्धतीनें कसलीहि घाई गडबड न होतां आणि गोंधळ न माजतां स्वस्थपणें पुरी होते.

पण भक्तांना निर्वेध मनानें पूजा करतां या वी आणि त्यांच्याकडून गैरवाजवी पैसा उकळला जाऊं नये यासाठीं केलेल्या या व्यवस्थेचाच विपर्यास कांहीं लोक करतात आणि संस्थानवर व्यापार–बाजीचा आरोप करतात! सोयीसाठीं निर्माण केलेली शिस्त हीच कांहींतरी वाईट गोष्ट आहे असें हे लोक म्हणूं लागतात!

चांगल्या गोष्टींचाहि विपर्यास कसा होतो याचा नमुना म्हणून हें उदाहरण सांगितलें. शिरडींतील व्यवस्थेबद्दल भक्तांच्या ज्या तक्रारी असतात त्या दूर करण्याचा अविरत प्रयत्न व्यवस्थापक मंडळाकडून चालू असतो. पण भक्तांनींहि तेथील व्यवस्था–खात्याशीं सहकार्य करणें अगत्याचें आहे. बाबांच्या दर्शनासाठीं आलेला प्रत्येक माणूस तेथून परत जायला निघतांना अंतःकरणांत शांतता व समाधान प्राप्त करून निघावा हीच संस्थानची इच्छा आहे. परस्पर समजूत व सहकार्य यांनींच हें घडणें शक्य आहे. असो.

## वाङ्मयप्रभु त्रिलोकेकर यांचें शोचनीय निधन

ज्ञानेश्वरीचे एक गाढे व्यासंगी, जुन्या पिढींतील एक नामवंत कवि आणि टीकाकार, साईलीलेचे विद्वान् लेखक वाङ्मयप्रभु खं. स. त्रिलोकेकर यांचें थोड्याशा आजारानंतर गेल्या मे महिन्यांत देहावसान झालें, हें कळविण्यास आम्हांला अतिशय दुःख होतें. चिकित्सकता आणि श्रद्धा, कवित्व आणि विद्वत्व यांचा मनोहर संगम कै. त्रिलोकेकर यांच्यामध्यें झालेला होता. संतवाङ्मयाचा आणि तत्त्वज्ञानाचा गाढ व्यासंग असूनहि विद्वत्तेचा अहंकार त्यांच्यामध्यें नव्हता. बाबांवर त्यांची भक्ति होती आणि साईलीलेवर त्यांचें निःसीम प्रेम होतें. त्यांच्या निधनामुळें महाराष्ट्र एका व्यासंगी विद्वानाला अंतरला आहे आणि आमचा एक प्रेमळ स्नेही व मार्गदर्शक नाहींसा झाला आहे. त्यांच्या निधनामुळें त्यांच्या असंख्य आप्तमित्रांना झालेल्या अनिवार दुःखांत आम्हीहि सहभागी आहोंत.

—संपादक




डॉ. रुस्तुमजी हे पारशी समाजांतील आहेत. ते शिर्डी संस्थानच्या धर्मार्थ दवाखान्यांत डॉक्टर आहेत. श्री. बाबा आपल्या सद्भक्तांस आपणांकडे कसे ओढून आणीत आहेत ह्याचा बोध डॉ. रुस्तुमजींच्या मुलाखतीवरून होत आहे. डॉ. रुस्तमजी १९३० मध्यें मुंबईत डबल न्यूमोनियानें आजारी पडले त्यामुळें त्यांना ॲम्ब्युलन्समधून पार्शी जनरल हॉस्पीटलमध्यें नेण्यांत आलें. त्यांची स्थिति कठीण असल्यानें त्यांना गॅसवर ठेवलें होतें. सुप्रसिद्ध डॉ. बिलीमोरिया व डॉ. गिल्डर यांचे उपचार सुरू होते. अशा त्या उभयतांनीं सर्व आशा सोडली होती. डॉ. रुस्तुमजी बेशुद्ध पडून होते. अशा स्थितींत श्री. साई महाराजांनीं त्यांना दृष्टांत दिला. पलंगाजवळ जाऊन विचारलें, “हमको पहचानता है?” डॉक्टरांनीं मानेनेंच नाहीं म्हणून सांगितलें. तेव्हां फिरून सांगितलें, “पहले अच्छे हो जाओ. फिर पीछेसे पहचानोंगे.” इतकें बोलून डॉक्टरांच्या पलंगास फेरी घालून ते अदृश्य झाले. दृष्टांतानंतर डॉ. रुस्तुमजी एकदम शुद्धीवर आले. हें पाहून हाऊस सर्जन डॉ. दारूवाला यांना आश्चर्य वाटलें. त्यांनीं फोन करून डॉ. गिल्डरना बोलावलें. डॉ. गिल्डरनीं एकवार प्रकृती पाहून सांगितलें, “आणखी चारपांच तासांनंतर निश्चित काय तें समजेल.” ज्याच्यावर समर्थांची प्रत्यक्ष कृपा झाली, त्याच्या संबंधानें डॉक्टर काय सांगणार? सायंकाळीं डॉ. गिल्डर व डॉ. बिलिमोरिया यांनीं तपासलें तेव्हां त्यांना महान आश्चर्य वाटलें. कारण त्यांनीं सर्व आशा सोडलेली होती. डॉ. रुस्तुमजी लौकरच बरे होऊन आपल्या घरीं आले.

पण त्यांना स्वप्नदर्शन दिलेल्या त्या महात्म्याचा सारखा ध्यास लागला. अशा स्थितींत सहा महिने गेल्यावर श्री बाबांनीं त्यांच्यावर फिरून कृपा केली. डॉ. रुस्तमजींना बसमध्यें शेजारच्या गृहस्थांच्या हातांत श्रीसाईमहाराजांचें इंग्रजी चरित्र दिसलें. पुस्तकावरील फोटो पाहतांच ह्याच तो महात्मा अशी त्यांची खात्री पटली. त्यांनीं तें पुस्तक हातांत घेऊन पाहिलें व लगेच श्रीसाईबाबांचा फोटो व चरित्र मागवून घेतलें. त्या फोटोची अत्यंत भक्तिभावानें पूजा करूं लागले. आपल्याला पुनर्जन्म देणाऱ्या महात्म्याच्या सेवेंत उर्वरित आयुष्य घालवावें असें त्यांचें मन त्यांस ग्वाही देऊं लागलें. सन १९४९ पर्यंत ते शिरडीस आले नव्हते पण रात्रंदिवस बाबांचाच ध्यास! शिर्डीस आल्यावर त्यांनीं सर्व आयुष्य बाबांच्या सेवेंत वेंचण्याचा निर्धार केला. श्रीबाबा भक्ताच्या सदिच्छेस

नेहमीं साह्य करतात. त्याप्रमाणें संस्थाननें शिर्डी येथें धर्मार्थ दवाखाना काढला. तेव्हां त्याची सर्व जबाबदारी डॉ. रुस्तुमजींनीं स्वेच्छेनें उचलली. दवाखान्यांत सर्व आधुनिक साधनें व उपकरणें आहेत. शहरांत मोठमोठ्या दवाखान्यांतूनही बरे न झालेलें रोगी ह्या दवाखान्यांतून बरे होऊन गेले. त्याचें कारण म्हणजे श्रीबाबांची कृपा व डॉ. रुस्तुमजींची धार्मिक भावनेची सेवा!

## असाध्य आजार बरा झाला!

डॉ. रुस्तुमजींच्या धर्मपत्नीवर धार्मिक संस्कार आहेत. खेरीज एका आश्चर्यकारक घटनेनें ते अधिक प्रबळ झाले. सौ. रुस्तुमजींना डोळ्यांचा आजार झाला. मुंबईतील डोळ्यांचे तज्ञ यांनीं सांगितलें कीं दृष्टी अधू होत जाऊन एका वर्षांत पूर्ण अंधत्व येईल! डॉ. रुस्तुमजी स्वतः जरी डॉक्टर असले तरी त्यांची औषधांपेक्षां श्रीसाईबाबांच्या सामर्थ्यावरच विशेष श्रद्धा आहे. नोव्हेम्बर १९४९ मध्यें बाईना हातास धरून शिरडीस आणण्यांत आलें. बाईनें समाधि मंदिरांत जाऊन बाबांची अंतःकरणपूर्वक प्रार्थना करून नवस केला कीं 'माझे डोळे बरे झाल्यास मी तुझ्या पालखीसाठीं स्वतः विणलेली शाल अर्पण करीन!' बाबांची कृपा झाली. तज्ज्ञ डॉक्टराच्या म्हणण्याच्या अगदीं उलट होऊन एका वर्षांत बाईची दृष्टी पूर्ण सुधारली. सौ. रुस्तुमजींनीं स्वहस्ते शाल विणून पालखीसाठीं अर्पण केली. ज्या डोळ्यांना शाल दिसणें— हीं अशक्य होतें त्यांच्याच आधारावर बाईनीं उत्कृष्ट शाल विणली.

मुंबई येथें सर्वश्रेष्ठ डोळ्यांच्या तज्ज्ञाला सौ. रुस्तुमजींची केस दाखवली. त्यांनीं अत्यंत काळजीपूर्वक तपासणी करून सांगितलें कीं ही केस व्हिएन्नामध्येंहि असाध्य गणली गेली असती! अशी केस शिरडीस दुरुस्त व्हावी हें बाबांचेंच सामर्थ्य!

## तळमळीच्या प्रार्थनेचें फळ

श्रीबाबांच्या समाधि काला नंतर सुमारें बारा वर्षांनीं कै. तात्याजी कोते पाटील दम्याच्या विकारानें आजारी पडले ताज्या अंजिराच्या रसांतून औषध दिल्याखेरीज गुण येणें अशक्य, असें वैद्यांनीं सांगितलें. तो अंजिरांचा हंगाम नव्हता सुक्या अंजिराचा उपयोग होणार नाहीं असें वैद्यांनीं सांगितलें होतें. श्री. बाबाजी गुरव यांचे तात्याजी पाटलांवर वडिलांसमान प्रेम! समाधि मंदिरांत जाऊन त्यांनीं श्रीबाबाची कळवळ्यानें प्रार्थना केली, "देवा, केवळ तात्या पाटलास जीवदान मिळावें म्हणून तूं आपलें देह विसर्जन केलेंस. ह्यावेळींही तूंच त्यांना यातनामुक्त केलें पाहिजेस!" श्री. गुरव संस्थानचे खजीनदार आहेत. ते काकड आरतीस नियमानें हजर असतात. त्याप्रमाणें मंदिरांत गेले असतां पुजाऱ्यानें त्यांना आश्चर्ययुक्त आवाजानें हांक मारून समाधीवरील चमत्कार दाखवला. तेथें डजनभर अगदीं ताजे अंजिर होते! अगदीं नुकतेच झाडावरून तोडून आणल्यासारखे!! श्री. गुरव आश्चर्यानें थक्क झाले. त्या अंजिरांच्या उपचारानें तात्या पाटील रोगमुक्त झाले.

(श्री. पां. बा. कवडे यांनीं लिहिलेल्या श्रीसाईमहाराजांच्या चरित्रावरून)

# ... शिरडींतील वैशिष्ट्यपूर्ण ...
# ... रामनवमी–महोत्सव ...

लेखक–**एक साईभक्त**

श्रीक्षेत्र शिरडी येथें श्रीमत्परब्रह्म सद्गुरु साईनाथ महाराज यांच्या समाधिमंदिरांत श्रीसद्गुरु साईनाथांनीं आरंभिलेला परंपरागत चालू असणारा श्रीरामनवमी महोत्सव सोहळा अपूर्व होता. श्रीसाईबाबांचे ध्यानयोगानें पवित्र झालेल्या या क्षेत्रांत बाबांचे समाधिनंतर अव्याहतपणें हा उत्सव अखंडपणें वाढत्या वैभवाने चाललेला आहे.

शिरडी माझें पंढरपूर श्रीसाईबाबा-रमावर, हा संत श्रेष्ठ दासगणूमहाराजांचा अनुभव लक्षावधि भोळ्या भाविकांना या उत्सव सोहळ्यामध्यें सहज अनुभवितां आला. श्रीबाबांची समाधि, ब्रह्मपीठच तें! या स्थानांत येणारा साधक भक्त या समाधि ब्रह्मासन्निध येतांच 'ब्रह्मानंदी लागली टाळी आतां कोण देहा तें सांभाळी' हा अनुभव येतो. बाबांचे समाधिस्थान म्हणजे हजारों भक्तांचें स्फूर्तिस्थान. या समाधिस्थानीं बाबा आपल्या भक्तांवर अमृतदृष्टीनें कृपाकटाक्षांचा–ब्रह्मचैतन्याचा साक्षात्कार अखंडपणे देत आहेत. पंढरपूर, आळंदी, गाणगापूर, नरसोबावाडी या क्षेत्रांत मिळणारा साक्षात्कारी अनुभव, त्र्यंबकेश्वर काशी विश्वेश्वर रामेश्वर या ठिकाणीं अनुभवितां येणारा पूजासोहळा–उपासनाक्रम यांतील आनंद तसेंच गिरिकंदरांत पूज्य अशा तपोवनांतून प्रतीत होणारा अननभूत आनंद–या सर्वांचा एकसमयावच्छेदें मिळणारा अखंड–आनंद या ठिकाणीं एकत्र एकदम अनुभवितां येतो. 'असो नसो भाव आलों तुझिया पाया कृपा दृष्टी पाहे मजकडे श्रीपंढरि साईराया' ही अनुभूति अनंत भक्तांना अनुभवितां येते. शिरडींत काय आहे हें प्रत्यक्ष अनुभविल्यानंतर न बोलतांच आनंदमय आनंदांत प्रत्ययास येतें. 'वेद-जणू गेला पुढें मौनावला–तें गुह्य तुजला प्राप्त कैसें! यांतील प्रश्नाप्रमाणें 'पूर्व सुकृताचा पूर्ण अभ्यासाचा दास सद्गुरुचा तोचि जाणे। सद्गुरुचा दास होऊन त्यांच्याचरणी अनन्यभावें शरणागति स्वीकारल्यानंतर शिरडींतील अनुभव अनुभवितां येतो.

लहान मोठे, विद्वान, शिक्षित, सुधारक, सनातनी, बुद्धिवादी, तत्ववादी, सुसंस्कृत नागरिकांपासून तो खेड्यांतील शेतकरी ग्रामीण जीवनापर्यंत विविध थरांतलि अनेक प्रकारचे अनेक भाषा, संप्रदाय, जाती, धर्म, उपासना पद्धती यांत गढलेले अशा विविधभक्तांची श्रीसाईबाबांवरील एकनिष्ठ अशी सामुदायिक भक्ति पाहिली म्हणजे मानवांचा–आतां विश्वात्मकें देवें–

या विश्वात्मक ब्रह्मस्थितिचा अनुभव येतो. आपआपला सर्व अहंकार–अहंभाव दुजाभाव-भेदभाव हा भावाभावांतील दूरावलंबी भाव विसरून–श्रीसाईनाथ हा एकच भाव ध्यांनीं घेऊन 'यारे यारे भलते नारी नर–स्त्री शूद्रादि आघवे या सर्वांचें भक्तिभावाचें मीलन या शिरडीक्षेत्रांत होते. एक भाव, एक ठाव,–हा अनुभव येथें येतो. बाबांचा प्रसाद सर्व आबालवृद्ध सर्व पंथ जाती–भाषांचे लोक एकाच पद्धतीनें एक ठिकाणी 'सहनाववतु सहनौभुनक्तु या पद्धतीनें मोठ्या प्रेमाने सेवन करीत असतात. अन्य क्षेत्रांत शिरडीचे पद्धती प्रमाणें अद्ययावत् सामूहिक व सार्वजनिक राष्ट्रीय अशा तऱ्हेचे भक्तिभावाचें प्रत्यक्ष अधिष्ठान नाहीं. शिरडीचे वैशिष्ट्य हें आहे. हें खरे भारतीय क्षेत्र आहे. ब्राह्मणापासून तो अनंत जाती जमातींतील लहान मोठे सुशिक्षितांपासून तो सामान्यांपर्यंत पार्शी, मुसलमान, ख्रिश्चन इत्यादि विविध धर्मांचे लोक–भारतीय संस्कृतिचें ब्राह्मविद्येचें अधिष्ठान पुढें ठेवून–इये मऱ्हाठिचिये नगरी–ब्रह्मविद्येचा सुकालु करी। घेणे देणे सुखचिवरी हो देईं—ही अनुभूति अनुभवितांना आनंदित होत होते. शिरडीच्या या सोहळ्यांत भारतीय एकता आध्यात्मिक भक्तिभाव आणि विश्वबंधुत्वाचा अनुभव एकसमयावच्छेदें प्रतीत होत होता.

शुक्रवारपासूनच शिरडी क्षेत्रांत उत्सवाचे वातावरण दरवळूं लागले. हजारो भक्त भाविक झुंडीवर झुंडीनें येत होते. शिरडी संस्थानचे विश्वस्थ समितीचे वतीनें येणाऱ्या भक्तजनांच्या आसऱ्याकरितां–सुंदर निवासस्थानें आहेत. विद्युद्दीपांची सोय, अद्ययावत शौच गृहे, स्नानगृहे, निवास भोजनादि व्यवस्था अद्ययावत आहे. येणारा साधक जणुं आपल्या मायमाहेरवरींच आलेला आहे. त्याच्या सर्व सुखसोयींची मायमाऊलीच्या कळवळ्यानें–प्रेमानें यथासंभव–व्यवस्था संस्थानचे कार्यकर्ते करीत असतात. पूजा उपासना पद्धति ठरवलेली असल्यामुळें या पद्धतीप्रमाणें कुणालाही बाबांची पूजा अभिषेक पारायण इत्यादिकांपैकीं झेंपणारा व आवडणारा कार्यक्रम करतां येतो. कीर्तन, प्रवचन, भजन इत्यादि कार्यक्रम चालूच असतात. पहाटे पांच वाजतां काकड आरतीचे दृश्य, दहा वाजतां पूजा दुपारी १२ वाजतां आरति संध्याकाळीं सात वाजतां आरती आणि रात्रीं शेजारती हे कार्यक्रम हृदयंगम व हृदयस्पर्शी असतात.

हा सोहळा वैकुंठीं नाहीं, हा संतांचा अनुभव येथें येतो. या उत्सवांत पुण्याचे श्री. अनंतराव आठवले, श्रीसंत दासगणू महाराज यांच्या परंपरेंतील कीर्तनकार यांची कीर्तनें झालीं. बाबांचे परमभक्त मुंबईचे प्रसिद्ध पंडित पद्मनाभशास्त्री पालये यांचीं बाबांचें कार्य यावर प्रवचनें झालीं. अनेक कलावंत भजनी यांची प्रेमळ संगीत भजनें झालीं. मद्भक्ताः यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि ' हें भगवंताचें सांगणें आणि वागणें येथें प्रतीत होत होतें. रामनवमीचे दिवशींचा सोहळा तर वेगळाच होता. आदल्या रात्रीं अखंडपणें भजने चालूंच होतीं. मोठ्या पहाटेपासून स्नाने करून पहाटेस ४॥ वाजतांच हजारो भक्त–स्त्रीपुरुष भक्तिभावानें काकड आरतीसाठीं उभे

होते. पूजा अभिषेकासाठीं बसच्या क्यू-प्रमाणें हजारो स्त्रीपुरुष रांगेत उभे होते. आपली निष्ठा, भक्तिप्रेम, सौजन्य, सेवा, सहकार्य, यांनीं ते हळुहळूं आपला नंबर मिळवून पूजा अभिषेक करीत होते. शिरडीच्या पूजा अभिषेकाचें दृश्य व अनुभव प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय त्यांतील आनंद उपभोगतां येणार नाहीं. दर्शना-साठीं रीघ अखंड चालूंच होती. दुपारचें कीर्तन–कीर्तनकार भक्तिभावांत रंगलेले आणि सद्‌गुरु कृपेनें ब्रह्मानंद उपभोगिलेले संत दासगणू महाराजांचे नम्र शिष्य श्री. अनंतराव आठवले–ज्यांनीं सद्‌गुरुला आठवलें परमेश्वराला हृदयसंपुटी सद्‌गुरु-स्वरूपांत साठवलें त्यांनीं श्रीसाईनाथांचें भक्ति प्रेमानंदानें भक्तांना कीर्तनानंदांत देहभाव विसरून एकरूप केलें. हजारों स्त्रीपुरुष भक्तिप्रेमानंदांत तल्लीन झाले होते.

कीर्तन हें लोक शिक्षणाचें सांस्कृतिक निष्ठेचें लक्षण आहे. सामुदायिक आणि वैयक्तिक वर्तन आचरण कसें असावें परमेश्वराला श्रीसद्‌गुरू स्वरूपांत कसें ओळखावें कसें शरण जावें याचे रसाळ अनुभवाचे बोल बुवांचे मुखांतून श्रीसाई-नाथ वदवीत होते. ‘बोलविता धनी वेग-ळाची’ याच श्रद्धेने बुवांचे कीर्तन चालूं होतें. श्री. आठवले हे धंदेवाईक कीर्तन-कार नाहीत. आपला व्यवसाय संभाळून ईश्वर सेवा करण्याची आवड असल्यामुळें भक्तिप्रेमाने कीर्तन करितात. श्रीसंत कवि दासगणू महाराजांचें चरित्र त्यांनी लिहिलेलें आहे. सुदृढ तरुण, सुविद्य, सुशील शास्त्रज्ञ नागरिक व समाजसेवक हरिदास असा सर्वांग सुंदर समन्वय बुवांचे व्यक्तित्वांत एकरूप झालेला आहे. वक्ते, लेखक, अभ्यासू, सद्‌गुरूचा दास, अनन्य भक्त आणि निरहंकारनिरभिमानी विद्वान या दृष्टीने श्री. आठवले यांचे व्यक्तिमत्व अविस्मरणीय आहे. महाराष्ट्रीय परंपरेंतील हा भव्य साक्षात्कारच आहे. शिरडी संस्थानचे विश्वस्थ–कार्यकर्ते यामध्यें सर्व व्यवसाय दर्जाचे–श्रीमानापासून विद्वानां पर्यंत सर्व प्रकारचे लोक आहेत. या सवांचें वैशिष्टय–हे सर्वजण निरभिमान वृत्तीने सेवा करीत असतात. उच्च पदवीधर, व्यापारी, पंडित, शास्त्री, तसेंच इंजिनीअर वकील डॉक्टर वृतपत्र व्यवसायी इत्यादि पेशाचे व्यवसायाचे लोक स्वयंसेवक होऊन काम करीत असतात, राष्ट्रीयत्वाचा परिपोष भारतीय अध्यात्मिक असें उच्च मानवी मूल्य जनमनांत दृढ करीत असतात हेंही शिरडीचे वैशिष्टय आहे.

भारताची परंपरा ही अध्यात्माची विश्वबंधुत्वसहिष्णु सत्प्रवृत्त सुसंस्कारांची आहे. ‘न घडो कोण्याही जिवाचा मत्सर’ हें भारतीय अध्यात्म संस्कृतीचें लक्षण आहे. शिरडीमध्यें हें लक्षण अनुभवा। येते. भारतीय तीर्थक्षेत्रांत शिरडीचें हें वैशिष्टय निर्माण झाल्यास भारताचें भारतीयत्व हें मानवतेचें वैशिष्टय म्हणून जगद्‌वंद्य होईल.

श्रीसाईनाथ महाराजांची समाधि सन १९१८ मध्यें झाली त्यानंतर गेली ३९ वर्षे हा सोहळा उत्सव अखंडपणे चालू आहे. बाबांचे चरित्र म्हणजे संतचरित्र. संतांचे संतपण त्यांच्या सन्निध येऊन त्यांची सेवा संगति केल्या शिवाय समजत नाहीं. संत संग देगा सदा हें मागणे आणि त्याप्रमाणें वागणे हें महाराष्ट्रीयांचें राष्ट्रीयत्व आहे. महाराष्ट्र संतांनी निर्मिलेला

राखलेला, वाढवलेला पुरस्कारिलेला आणि जगद्विकासांत प्रभावी केलेला महान् प्रांत आहे. भेदभाव रहित ऐक्य हें महाराष्ट्राचें ब्रीद—यासाठीं महाराष्ट्रांतील तीर्थ क्षेत्रांत संतांनीं अखंड ध्येय-दीप—ध्यान ध्येय ध्याता—ही त्रिपुटी जागृत ठेवलेली आहे. महाराष्ट्र हा देहू आळंदी पंढरपूर शिरडी येथील वातावरणांत आहे. 'इये मऱ्हाठीचिये नगरी—ब्रह्मविद्येचा सुकाळु करी घेणे देणें सुखचि वरी—ही संतशिरोमणी ज्ञानेश्वर महाराजांची प्रचीति शिरडी या महाराष्ट्रीय क्षेत्रांत पूर्णत्वानें येते.

श्रीसाईनाथमहाराज हे नाथ संप्रदायांतील महान् योगी. श्रीज्ञानेश्वर माऊली ज्या नाथ संप्रदायांतून प्रकटली त्याच ज्ञानगंगेतून श्रीसाईनाथ प्रकटले. ज्ञानदेवें रचिला पाया—तुका झालासे कळस हीं संतकृपेनें घडलेली महाराष्ट्र संतसंस्कृतीची इमारत साईनाथांनी आपल्या दिव्य धुनीनें, उदीनें राम उपासनेनें आणि अखंडपणें सर्व धर्मांच्या भाविक भक्तांना वावरण्यासाठीं—आपला संसार सुखाचा करून घेण्यासाठीं सर्वांसाठीं खुली केली मोकळी दिली. परमेश्वराची भक्ती हेंच मुख्यसाधन धर्म हें बंधन नसून तें लक्षण आहे. कर्तव्याचें रक्षण करण्याचें साधन आहे. परमेश्वर सर्व प्राणीमात्रांचे ठिकाणी सर्वांतर्यामी सारखाच आहे. सर्वांभूती भगवंत पहाणे आणि त्याप्रमाणें नित्य नैमित्तिक व्यवहारांत वागणे हीच श्रीसाईनाथांची शिकवण. सन १९१८ साली त्यांची समाधि झाली. तत्पूर्वी किमान साठ वर्षे त्यांचें वास्तव्य शिरडी क्षेत्रांत झाले. सन १८५७ नंतरचा हा काळ—याच काळांत भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीचें समुद्रमंथन चालू होतें. या समुद्रमंथनातून लोकमान्यांसारखे महान राष्ट्र धुरीण प्रकटले. श्रीसाईनाथ हे या विचारमंथनाची मंथा होत. शिरडीच्या या क्षेत्रांत या महान पुरुषानें राष्ट्रीयत्वाची भारतीय आध्यात्मिक संस्कृतीची उपासना आणि जोपासना आत्यंतिकतेनें करून सर्व प्रकारच्या लोकांना सत्यधर्माचें संतांच्या शिकवणुकीचें रहस्य उलगडून आचारणांत आणून दाखविलें. धर्म नीतीचा ऐकुनि व्यवहार निवडिलें सार असारतें। तुका म्हणे धर्म रक्षावयासाठीं देवासही अटी जन्म घेणें ।। या संतशिरोमणी तुकाराम महाराजांच्या अभंग वाणी प्रमाणें श्री साईनाथांची रहाणी, वागणी करणी वाणी आणि समाजाच्या मनोभूमिकेची उभारणी होती. साईचरित्राचा राष्ट्रीयत्वाशी मोठा संबंध आहे. रामरायाचा राष्ट्रपुरुषाचा महान् उत्सव साईनाथांनीं याचसाठीं सुरू केलेला आहे.



# संसाराकडून विठ्ठलाकडे——

**दुःखाचा आघात हा चित्तशुद्धीसाठीं ईश्वरानें दिलेला वर-प्रसाद असतो. पण हा प्रसाद ग्रहण करण्यालाहि माणसाच्या मनाची तयारी व्हावी लागते. ही तयारी करण्याइतकी झुंजार वृत्ति ज्याच्यामध्यें आहे त्यालाच संतपण लाभतें. संतश्रेष्ठ श्रीतुकाराम महाराज यांच्या मनाची संसाराकडून विठ्ठलाकडे कशी कशी प्रवृत्ति वळत गेली, याचा अभ्यास अलीकडे अधिकाधिक होऊं लागला आहे. मराठींतील एक व्यासंगी विद्वान् कै. पु. मं. लाड यांनीं तुकाराम महाराजांचें जें चरित्र लिहिलें आहे, त्यांत या अभ्यासाचें चिकित्सक वळण आहे. त्या चरित्रांतील ‘ सारासार विवेक ’ या प्रकरणामधील कांहीं भाग जिज्ञासू वाचकांसाठीं येथें देत आहोंत……**

……तुकारामास सावकारीचा हळू-हळू वीट येऊं लागला होता. व्याजानें संपत्ति संपादन करण्यांत जी आत्महानि होते तिची जाणीव त्याला होत होती. ‘ ऋण वैर हत्या । हें तों न सुटे नेंदितां ॥ ’ हा सावकारीचा निर्घृण नियम माणुसकी जाणतच नाहीं. सुपांतले व जात्यांतले—कालांतरानें तो या सर्वांना सारखेंच भरडून टाकतो. निःसत्त्व रयतेकडून रोख्यांतील लेखाप्रमाणें आपणांस येणें असलेला मांसाचा लचका तोडून घेण्याइतका तुकाराम कसाब शॉयलॉक झाला नव्हता. ‘ व्याजें कासाविसी बहु केलें ’ अशीं गयावया करणारीं कुळें त्याला आतां प्रत्यहीं भेटत होतीं. त्यांच्या दारांत धरणें धरून बसणें, त्यांना माजघरांत कोंडणें, ‘ धरुनि पालव असुडीन करें ’ अशी त्यांची चारचौघांत विटंबना करणें—हे सारे सावकारीचे निष्ठुर पाश आवळणें त्याच्या अंगवळणीं पडेना—खिस्तीच्या उदीमांत आनंद मानणारे ब्राह्मणहि त्याच्या माहितींत होते. त्यांचें ब्रह्मज्ञान त्याजपाशीं नव्हतें; उलट स्वतः कुणबी असल्यामुळें कुणबी कुळांच्या सुख-दुःखांचें त्याला चांगलेंच ज्ञान होतें. या खिस्त्यांचा किळस यावा अशा भाषेंत त्यानें कसा उपहास केला आहे :—

‘ खिस्तीचा उदीम ब्राह्मण कलियुगीं ।  
महारवाडीं मांगीं हिंडतसे ॥ १ ॥  
वेवसाव करितां पर्वत मांगासीं ।  
ते पैं विटाळासी न मानिती ॥  
मांगिणीसी नित्य करीतसे लेखा ।  
तोंडावरी थुंका पडतसे ॥ ’

‘ अंगीं ब्रह्मक्रिया खिस्तीचा व्यापार ।  
हिंडे घरोघर चांडाळाचे ॥  
अंत्यजा खिचडी घेताती मागून ।  
गाळिया प्रदान माया बहिणी ॥ ’

दुष्काळांत थकलेल्या कुळांकडून वसुली उकळण्यासाठीं हीं सारीं ब्रह्मास्त्रें वापरण्याइतकें त्याचें मन निर्विकार झालें

नव्हतें. व्याज हें पाप आहे—'शमलं कुसीदम् '—हें त्याच्या सभोंवतालच्या इस्लामास सुद्धां पसंत असलेलें उपनिषदाचें तत्त्वज्ञान दुष्काळानें त्याला शिकविलें. म्हणूनच दुष्काळानंतर कर्जरोखे इंद्रायणींत बुडवून हें पाप त्यानें कायमचें धुवून टाकलें.

किंबहुना श्रीमंतींत पापाचा अंश हा असावयाचाच याची त्याला प्रचीति येऊं लागली होती. वजनमापांचें सत्य व्यापारी पाळीत नव्हते व भोळ्याभाबड्या साळ्या कोष्टयांना ठकवीत होते हें तो पाहात होता. ठकाठकींतच नफा ठीक होतो. सत्याचा जय होतो खरा, पण संपत्तीच्या चढाओढींत सत्यवानास हमखास विजय मिळत नाहीं, हें नानाविध वैश्यव्यवसाय करून त्याला आतां कळून चुकलें होतें. नफ्याच्या प्रमाणांत पापाची रास वाढते हें व्यवहाराचें त्रिकालाबाधित त्रैराशिक तो शिकत होता. आपल्या भोंवतालच्या प्रतिष्ठित धंद्या-हुद्या विषयीं त्याचा जो ग्रह झाला होता तो त्यानें पुढें आपल्या शिरस्त्याला अनुसरून स्पष्ट शब्दांत मांडला आहे :—

'कांहीं दुसरा विचार ।
न लगे करावाचि फार ॥
सेट्या ना चौधरी ।
पांडेपण वाहे शिरीं ॥
पाप न लगे धुंडावें ।
पाहिजे तरी तेथें जावें ॥
जकातीचा धंदा ।
तेथें पाप वसे सदा ॥
गाई म्हैसी हेड ।
तूप विकी महा द्वाड ॥
तुका म्हणे पाहीं ।
तेथें पुण्या रीघ नाहीं ॥

या पापापासून अलिप्त राहावयाचा प्रयत्न करून त्यानें आपलें हंसें करून घेतलें होतें. कारण सत्यानें पैसा मिळवितां येतो ही कल्पनाच मुळीं व्यापाऱ्यांना हास्यास्पद वाटते. या दृष्टीनें अर्थार्जन हें त्याला अनर्थावह वाटूं लागलें होतें. 'अवघें पाप केलें तेणें । जेणें सोनें अभिलाषिलें ॥' हा सिद्धान्त तो अनुभवानें बसवीत होता.

ज्यांच्याकरितां 'दिवसा व्यापार चावटी । रात्रीं कुटुंबचिंता मोटी' करावयाची, 'खाटेवरी पडतां । (ज्यांची) व्यापी चिंता तळमळ ॥' तीं सारीं 'पुत्र पत्नी बंधू खाणोरीं' केवळ सुखाचे सोबती आहेत, याची विपरीत काळांत त्याला खात्री पटली. आधींच तो दोन बायकांच्या भांडणांनीं वैतागून गेला होता. या निजसेजेच्या अंतुऱ्यांच्या नाजुक कटकटी मिटविण्यांत त्याचा जीव मेटाकुटीला आला असणार. एका छपराखालीं दोन स्त्रिया म्हणजे भांडणतंटा, हा संकेत चिनी वर्णलिपींत वज्रलेप करून टाकिला आहे! तुकारामानें स्वानुभवानें हा सिद्धांत बांधला कीं, 'एका पुरुषा दोन नारी । पाप वसे त्याचें घरीं ॥' दोन बायकांबरोबर या पापाचाहि तो धनी झाला होता. ही दुसरी नवी राणी तरणीताठी आणि मोठ्या श्रीमंताची लेक. तिचा 'धांगडधिंगा' तसाच मोठा. पहिली जुनी सोबतीण; आणि तशांत तिनें पुत्राचा अहेर केलेला. एकीकडे काम ओढी तर दुसरीकडे प्रेम ओढीत होतें. या भेदाभेदांच्या ओढाओढीमुळें 'सेज बाज भोगविलासांत' तरुण दंपतीच्या एकचित्ततेनें त्याचा लय लागेना. नुकसान

येऊन धंदा बसला तेव्हां नव्या व्यवसायांच्या अखंड हव्यासानें पीडिलेल्या जिवाला विलास गोड तरी कसे लागावेत ? धनाबरोबर बायकांकडून मिळणारा प्रेमाचा मान आटत चालला होता. स्वतःच्या पोटाला जेव्हां चिमटे घ्यावयाची त्यांना पाळी आली तेव्हां तर त्या त्याला उघड चिमटे घेऊं लागल्याः—

‘ घरीं हळहळ करिती दारा ।
म्हणती संसारा काय करूं ॥
आम्ही उठलों माणसांतून ।
खावयासी अन्न मिळेना ॥
घरीं कांता ऐशा रीतीं ।
नानापरीचे अपशब्द बोलती ।
बाहेर पिशुन सर्व हांसती ॥ ’

अशा वातावरणांत ‘ जन हे सुखाचे दिल्या घेतल्याचे । ’ हें साऱ्या संसारासंबंधींचें सारतत्त्व त्याला समजूं लागलें.

ज्या मायबापांच्या व दारापुत्रांच्या संगांत माया गुंतवावयाची ते तर नित्य मृत्यूच्या संगतींत असतात, हें लागोपाठ घडलेल्या पांच मृत्यूंनीं त्याला पुरतें कळून चुकलें. मृत्यु—दुःखाचें ‘ आर्यसत्य ’ अशा प्रकारें त्याच्या आयुष्यांत आरंभींच स्थापिलें गेलें. त्यानेंच म्हटल्याप्रमाणें, ‘ जीवा नाहीं कुडीचें लाहातें । ये भिन्न पंच भूतें । रचतें खचतें संचितें । असार रितें फलकट ॥ पुत्र पत्नी सहोदर । मायबाप गोताचा पसर । मिळतां काष्ठें लोटितां पूर । आदळीं दूर होती खळाळीं ॥ ’ हा अनुभवाचा कडू घुटका त्याला घोळवून घोळवून गिळावा लागला.

गोताचा पसाराच काय, भोंवतालीं दिसतें तें सारेंच फलकट सृष्टीच्या एका निःश्वासानें चटसारें उडून जातें हें त्याला दिसून आलें. राष्ट्रावर आलेल्या असल्या दारुण आपत्तींनीं जगताला अनीश्वर म्हणणारे आसुरी संपत्तीचे वारस सुद्धां क्षणभर गोंधळून जातात. लिस्बन शहराचा एक भाग दिसतां दिसतां खचून जाऊन समुद्रांत लुप्त झाला असतां, युरोपांतील अठराव्या शतकांतील निरीश्वरवादी सुद्धां संदेहांत गटांगळ्या खाऊं लागले. तेव्हां हें जग केवळ ‘ कामहैतुक ’ नसून, मानवाचीं क्षुद्र कळसूत्रीं बाहुलीं खेळविणारा कोणी नियंता असला पाहिजे असें तुकारामसारख्या सामान्य माणसास वाटलें तर आश्चर्य कसलें ? एकट्या मानवाचा दुबळेपणा विश्वांतील विश्वंभरांत विलीन होतांच नाहींसा होतो व त्याला देवाचें बळ लाभतें ही सिद्धि महाराष्ट्रांतील संतचरित्रांच्या द्वारां त्याच्या ऐकिवांत आली होती. तिच्या शोधाकडे त्याची वृत्ति साहजिकच वळूं लागली.

अशा मनोवृत्तींत तुकाराम सारासार विवेक करूं लागला तर नवल नाहीं. तुकारामाच्या वैराग्याकडे दोन निरनिराळ्या दृष्टींनीं लोक पाहात आले आहेत. कांहींना असें वाटतें कीं, ‘ प्राणी भोगिती त्रिविध नरक । मग पश्चात्तापें करूनि देख । मोक्ष सुख पावती ॥ ’ या संतचरित्रांच्या सिद्धान्ताचें हें आणखी एक उदाहरण आहे. संसार वमन झाला तरी पुनः पुनः संसारचक्र सारखें चालू ठेवणें यांतच कांहींना पुरुषार्थ वाटतो. त्यांच्या मतें तुकारामाचें वैराग्य या संसाराच्या रणांगणांतून पाय मागें घेणाऱ्या भ्याडाचा पळपुटेपणा होय. त्यांना असें वाटतें कीं आपत्तीच्या भरानें तुकाराम वांकला, त्याची दृष्टि विकृत

झाली व त्याच्या हतबल आत्म्याला समग्र जीवनाचें दर्शन होऊं शकलें नाहीं. तुकारामाच्या वैराग्याच्या दोन मीमांसेंतील ही उत्तरमीमांसा सर्वथैव चुकीची आहे. पूर्व मीमांसेंत तथ्य आहे, पण तें परंपरागत पद्धतीनें मांडलें आहे. त्रिविध तापांनीं या प्रकारें पोळला असतां जो संसारांत पूर्ववत् लोळूं शकतो त्याला ग्रामपशु म्हटल्यानें फारसा अन्याय होणार नाहीं. उलट अनुताप झाला म्हणजे माणूस मुक्त होतोच असा नियम नाहीं. अनुतापाचा मार्ग चालूं लागलें म्हणजे वळणावरच कांहीं मोक्षाचें गांठोळें ठेवलेलें नाहीं. तो मार्ग खडतर आहे, वाटेंत अनेक कांटे आहेत. प्रस्थान काढणाऱ्या सर्वांनाच पेणें गांठतां येत नाहीं.

खरें पाहतां वर सांगितल्याप्रमाणें तुकारामांच्या वृत्तींत हळूहळू पालट होत चालला होता. ज्यांना आपण आधुनिक भाषेंत 'जीवनाचीं मूल्यें' म्हणतों त्यांच्याप्रत तो संसाराच्या अंधकारांतून चांचपडत चालला होता. आर्यांच्या भाषेंत यालाच सारासारविवेक म्हणत असत. बुद्धाच्या शब्दांत सांगायचें म्हणजे :—

असारे सारमतिनो
सारे चासारदस्सिनो ।
ते सारं नाधिगच्छन्ति
मिच्छासंकप्पगोचरा ॥
सारंच सारतो ञत्वा
असारंच असार तो ।
ते सारं अधिगच्छन्ति
सम्मासंकप्प गोचरा ॥

[ असार तें सार मानी
देखें सारीं असार जो ।
तयाला सार लाभेना,
मिथ्या संकल्पि जो भ्रमे ।
सारांत सार जो जाणी,
असारांत असार ही ।
तयाला सार लाभे जो
सत्यसंकल्पि वावरे ॥ ]

संसार हा दारापुत्रधनाभोंवतीं उभारलेला पसारा आहे. त्यांतील सार आणि असार शोधून काढण्यांत तुकारामाच्या वृत्ति आतां गुंतल्या. या शोधांत सत्यसंकल्पाचा दाता पांडुरंग त्याला भेटला. या कटेवर हात ठेवलेल्या नावाड्यानें त्याची नाव पैलतीराला नेली. भवसागरांतील वादळाच्या मारानें डोलकाठी तुटून पडली तरी सुद्धां तारूं सोडून जाणारा तुकाराम हा भित्रा खलाशी नव्हता. 'डगमगी तो वांयां जाय । धीर नाहीं गोता खाय ॥' हें ब्रीदवाक्य झंझावाताशीं झुंजणाऱ्या वीरांना त्यानें दिलें आहे. जडत्व कमी करण्यासाठीं अहंतेचीं गाठोळीं फेंकून देत, वासना उपसून टाकीत, तारूं तरंगत ठेवण्यासाठीं तो अखंड झगडत राहिला असता. पण विठ्ठलाच्या हातीं सुकाणूं दिल्यामुळें भवाब्धि पार तरून जाणें त्याला सोपें झालें.

---

● मजमाजीं रंगली चित्तवृत्ती । या लागीं
विसरला गृहासक्ति । त्यासि गृहाश्रमींच
माझी प्राप्ती । निश्चयें जाण उद्धवा ॥

—श्रीएकनाथ

# भक्तावतंस नाना

ना. वा. गुणाजी

## नारायण गोविंद उर्फ नानासाहेब चांदोरकर

## ( १८६०–१९२१ )

[ मागील अंकावरून समाप्त ]

**नानाची पुरणपोळी** ( श्रीसाईलीला वर्ष १ लें. अंक ५ आणि वर्ष ६ अंक १–२ ( पान ६६५ )

एकदां नानासाहेब एकटेच शिरडीस बाबांच्या दर्शनार्थ दुपारीं बारा वाजल्यानंतर गेले. दर्शनवंदनादि विधि आटपल्यावर बाबा म्हणाले कीं–नाना, आज मला पुरणपोळी खावीशी वाटते. तर तूं ती करून आण. नानानीं सांगितलें कीं, आतां फार उशीर झाला आहे, घरची कोणी मंडळी येथें नाहीं, तसेंच यावेळीं ती तयार करणेस येथें कोणी माणूस मिळणार नाहीं. तेव्हां बाबा म्हणाले–उशीर झाला तरी हरकत नाहीं, पण आजच मला पुरणपोळी हवी. पुढें नानानीं पुष्कळ आढेवेढे घेतले, पण बाबा आपला पुरणपोळीचा आग्रह कांहीं सोडीनात. तेव्हां नाना गांवांत गेले आणि पुष्कळ प्रयत्न करून त्यांनीं एक बाई मिळविली आणि सर्व सामानसुमान आणवून देऊन तिच्याकडून पुरणपोळीसहित स्वयंपाक तयार करवून चार वाजणेचे सुमारास पुरणपोळीचें नैवेद्याचें ताट मशीदींत आणलें, आणि बाबांपुढें सादर केलें. तेव्हां बाबा म्हणाले, बरें आहे, तें ताट परत घेऊन जा. नानांना थोडेंसें वाईट वाटून ते म्हणाले कीं, बाबा, आपणास खावयाचें नव्हतें आपण या ताटाला स्पर्श न करितां ते परत घेऊन जाणेस सांगतां, तर मला इतका खटाटोप तरी करावयाला कां लाविलें ? तेव्हां बाबा शांतपणें म्हणाले, काय नाना, माझ्याकडे १८ वर्षेपर्यंत येत राहून तूं हेंच काय शिकलास ? माझी पारख अशीच का तूं केलीस ? बाबा म्हणजे हा औट हाताचा देह दिसतो तेवढाच आहे का ? अरे नाना, मी मुंगी माशी किंवा दुसरें वाटेल तें रूप धारण करून खातों, मी तुझी पोळी माशीच्या रूपानें केव्हांच खाली आहे, तूं आतां जा आणि जेवण कर. इतक्यानें नानाची समजूत पटेना तेव्हां बाबानीं त्यांना कांहीं सांकेतिक खूण करून ( ही खूण काय

असावी याची आम्हांला कल्पनाच करवत नाहीं ) ही गोष्ट पटविली आणि सर्वभूती भगवद्भावाचा धडा शिकविला.

**'भूतीं सदैव भगवन्त':—** श्रीसाईलीलेच्या मागील कांहीं महिन्यापूर्वीच्या अंकांत 'श्री साईबाबांची शिकवण' या सदराखालीं बाबांनीं श्वानाच्या रूपानें, श्री. रामचंद्र आत्माराम तर्खड यांच्या प्रेमळ पत्नीकडून भाकरीच्या तुकड्याच्या मेजवानीचा कसा आकंठ तृप्तिपूर्वक स्वीकार केला (श्रीसाई सच्चरित अध्याय ९ ) आणि मार्जाराच्या रूपानें शिंक्यावरील दहीं मारासहित खाऊन शाकोरीची काशीबाई हंसराज इच्या पतीचा दमा कसा बरा केला ( भक्तानुभव इंग्रजी भाग २ रा, पान ११३–११४) या कथा सांगितल्या आहेत, त्या वाचकांनीं पुनः अवश्य वाचून पहाव्यात अशी सूचना करितों.

**जिंकण्यास सोपा विकार** (श्री साईलीला व. ५ अं. ११–१२, पान ६४९ ) एकदां बाबा नानास म्हणाले– सर्व षड्रिपूंत जिंकण्यास सोपा विकार कोणता? नानांनीं सांगितलें कीं–मला माहीत नाहीं. तेव्हां बाबा म्हणाले–अरे, **मत्सर** हा विकार जिंकण्यांत सर्वांत सोपा. यांत आपलें नफा नुकसान कांहीं नाहीं. मत्सर म्हणजे दुसऱ्याचा उत्कर्ष सहन न होणें. दुसऱ्याचा उत्कर्ष पाहिला कीं, आपणांस तें सहन होत नाहीं, आपण त्याची निंदा व कुचेष्टा करितों, दुसऱ्यास ऐश्वर्य प्राप्त झालें तर आपलें त्यांत काय नुकसान आहे? उलट आपण आनंद मानावा आणि हवें तर आपणहि तसें ऐश्वर्य मिळवूं अशी हिंमत धरावी आणि त्या दिशेनें नेटानें प्रयत्न करावा. पण इतरांचा उत्कर्ष झाला म्हणून आपण विषाद मानू नये.

**प्राण्या बोलावें बहु गोड, पण खरें.** (श्रीसाईलीला व. ५ अंक ११–१२, पान ६४९–६५३. आणि श्रीसाईसच्चरित, अध्याय ३८, १२६–१४६ ).

बाबानीं एकदां नानाला असा धडा दिला कीं, सार्वजनिक कामासाठीं कोणी आपलेजवळ कांहीं मागूं लागला, तर आपणांस कांहीं मदत करितां येण्याजोगी असेल तर ती अवश्य करावी, पण तशी मदत करितां येत नसेल तर तसें स्पष्ट पण गोड शब्दांत सांगावें. उपहास अगर थट्टा करूं नये, किंवा रागावूं नये. नाना म्हणाले कीं, हें मी ध्यानांत ठेवीन आणि त्याप्रमाणें वागेन. बाबा म्हणाले, हा धडा जितका सोपा दिसतो तसा तो नसून आचरण्यास कठीण आहे. तेव्हां नाना म्हणाले हा धडा मी मनापासून लक्ष्यांत ठेवून आचरणांत आणीन.

यापूर्वी असा प्रकार घडला होता कीं. कोपरगांव–शिरडीच्या रस्त्यावर श्रीगोदातटीं एक लहानसें दत्तमंदिर असून शिरडीस जातांना नानासाहेब या मंदिरांत दत्तदर्शन घेण्याकरितां नेहमीं जात असत. त्या मंदिरांत राहाणारे बोवा गरीब व सालस होते. त्यांचा व नानासाहेबांचा परिचय झाला. पुढें कांहीं दिवसांनीं, नानासाहेब हे मोठे उदार व भाविक आहेत अशा समजुतीनें त्या बोवांनीं त्यांचेजवळ अशी एक गोष्ट काढली कीं, या दत्तमंदिरासमोरील नदीवर घाट बांधून द्यावा, घाट बांधल्यास लोकांची पुण्याची

व स्नानसंध्येची सोय होईल आणि हें श्रेय नानासाहेबानीं घ्यावें. हें काम आपल्या आवाक्याबाहेरचें आहे असें नानासाहेबानीं सांगितलें. पण वरचेवर बोवा या विषयीं नानासाहेबांना सांगत असत. पण नानासाहेब कांहीं कबूल करीत नसत. बोवाच्या नेहमींच्या विनवण्याला नाकार देणें नानासाहेबांना जड जाऊं लागले, आणि त्यांनीं सांगितलें कीं, सर्व घाट बांधून घेण्यास हजारों रुपये लागतील व तशी तजवीज होणें शक्य नाहीं. पण मंदिराच्या रुंदीइतकाच दहा–बारा पायऱ्यांचा घांट बांधणेस अजमासें तीनशें रुपये खर्च येईल आणि तो मी करीन. इतकें झालें तरी पुष्कळ काम होईल असें बोवांनीं सांगितलें. याप्रमाणें दोघांचें संभाषण होऊन नानासाहेब नगरास गेले.

पुढें कांहीं दिवसांनीं नानासाहेब आपले साडु बिनीवाले यांना घेऊन बाबांच्या दर्शनास निघाले. थोडीशी रात्र असतांच ते कोपरगांवीं आले तेव्हा नानासाहेबांच्या मनांत आलें कीं, दत्त दर्शनासाठीं आपण मंदिरांत गेलों तर बोवा आपलेपाशीं तनिशें रुपये मागेल, तर आपण ते बरोबर आणले नाहींत, किंवा त्याबाबत कांहीं व्यवस्थाहि अद्याप केलेली नाहीं. तेव्हां काय करावें ? इतक्यांत त्यांना एक युक्ति सुचली कीं, या खेपेस मंदिरावरून न जातां परभारें दुसऱ्या मार्गानें शिरडीस जावें. ही युक्ति बिनीवाल्यांनाहि पटली. पुढें शौचमुखमार्जनासाठीं आडवाटेनें गेले असतां त्यांच्या अंगांत बाभळीचे व निवडुंगाचे कांटे बोचले, यामुळें त्यांना बराच त्रास झाला आणि वाटेंत त्यांचे बरेच हाल झाले. पुढें ते शिरडीस आले आणि मशीदींत बाबांच्या दर्शनास गेले असतां बाबा त्यांचेवर बरेच रुसले आणि रागावले आणि त्यांचेशीं बोलण्याचें त्यांनीं टाळलें. या अबोल्याचें कारण विचारतां सर्वसाक्षी बाबा म्हणाले कीं, अरे नाना, बोवा तीनशें रुपये मागेल म्हणून तूं सरकारचें (श्रीदत्ताचें) दर्शन टाळलेस व आडमार्गानें आलास, अशा रीतीनेंच मी घालून दिलेला धडा तूं आचरणांत आणतोस काय ? तूं रुपये आणले नव्हतेस किंवा त्यांची सोय तुजकडून झाली नव्हती तर तो बोवा तुला काय खाता ? पैशाची सोय झालेली नाहीं असें स्पष्ट सांगावयाचें सोडून सरकार दर्शन टाळून आडमार्गानें तूं यावें ही कोठची युक्ति ? पायांत व व अंगांत कांटे शिरून प्रायश्चित मिळालें कीं नाहीं ? अशा मनुष्याशीं आपण कां बोलावें ? बाबांच्या सर्व साक्षित्त्वाबद्दल कौतुक वांटून नानांनीं आपली चूक कबूल केली आणि पुनः आपण असें करणार नाहीं म्हणून बाबांना वंदन केलें.

**भिक्षेकऱ्यांशीं वर्तन**—(श्रीसाईलीला) व. १ अं. ५ व व. ५ अंक ११–१२, पान ६५३–६५६). वर सांगितल्यासारखाच भिक्षेकऱ्यांशीं कसें वागावें या संबंधीं बाबांनीं नानाला एकदां असा धडा दिला कीं, आपल्याकडे कोणी मागावयास आला तर, त्याला आपल्या शक्तीप्रमाणें व इच्छेप्रमाणें द्यावें, तेवढ्यानें त्याची तृप्ति होत नसेल तर गोड शब्दांनीं नाहीं म्हणून सांगावें, त्याचेवर रागाऊं नये किंवा आपल्या संपत्तीचा अथवा अधिकाराचा जोर दाखवूं नये. नानासाहेबांनीं हें मान्य केलें

आणि आपल्या गांवीं (कल्याणास) निघून गेले. त्यांचे वाड्यांत एक भिकारीण भिक मागणेस आली. नेहमींप्रमाणें नेहमीची भिक्षा घरांतील मंडळी घालूं लागली तरी ती भिकारीण भिक्षा घेईना. नानासाहेबांच्या पत्नीनीं डेराभर भाजणी घरीं तयार करून ठेविलेली होती. भिकारीण म्हणू लागली कीं, मला भिक्षा नको, भाजणी घाला. तेव्हां तिला थोडी भाजणी घालणेत आली; ती पुनः अधिक भाजणी मागूं लागली. माईसाहेबांनीं अधिक भाजणी घातली, तरी तिचें समाधान होईना. शेवटीं अर्धी भाजणी घालणेचें कबूल केलें, तरी ती कबूल होईना, संबंध डेराभर भाजणी मागूं लागली. तेव्हां माईसाहेब रागावल्या आणि म्हणाल्या कीं, तूं फार शाहणी दिसतेस; वाटेल तर अर्धी घे, नाहीं तर जा येथून. ती हट्टी भिकारीण आपलाच हेका धरून बसली आणि घराबाहेरही जाईना. तेव्हां निरुपाय होऊन माईसाहेबांनीं ही सर्व हकीकत दिवाणखान्यांत बसलेल्या नानासाहेबांच्या कानावर घातली. तेव्हां नानासाहेब रागावून खालीं आले आणि शिपायाला म्हणाले कीं, भिकारीण तर भिकारीण, आणि मागते सगळीच भाजणी. सगळी भाजणी मागावयास हिला लाज कशी वाटत नाहीं ! देतात तितकी घे म्हणून सांग, नाहीं तर हिला हाकलून द्या. तेव्हां ती म्हणाली—सगळी भाजणी द्यावयाची नसेल तर नका देऊं; पण शिपायाकडून गचांडी देऊन कशाला हाकलून देतां, मीच जातें आपली, असें म्हणून ती निघून गेली.

पुढें कांहीं दिवसांनीं नाना बाबांच्या भेटीस शिरडीस गेले. तेव्हां बाबा पुनः रागावले आणि त्यांनीं नानाशीं बोलणें टाळलें. नानांनीं विनंति करितांच बाबा म्हणाले कीं—सांगितलेला धडा जो आचरणांत आणीत नाहीं त्याचेशीं कां बोलावें ? सर्व भाजणी मागणाऱ्या भिकारणीस तूं शिपायांकडून हांकून लावणार होतास ना ? ती कांहीं वेळ तुझ्या दारांत बसून निघून गेली असती. गोड शब्दांनीं तिची बोळवण करण्याऐवजीं तिला शिपायाकडून घालवून देण्याची मजल तूं कां आणलीस ? पांच सहा महिन्यापूर्वं घडलेल्या या गोष्टीचें स्मरण नानासाहेबांस प्रथम होईना. पुढें लगेच त्यांना त्या भिकारणीची गोष्ट आठवून त्यांना या विषयीं सानंदाश्चर्य वाटलें. बाबा अशा प्रकारच्या भिकारणीचें सोंग घेऊन आपली परीक्षा घेतील ही कल्पना त्यांना नव्हती. पण बाबांचा धडा किंवा शिकवण देण्याची तऱ्हा आणि शिष्य ती शिकवण आचरणांत आणतो. कीं, नाहीं याची परीक्षा घेण्याची तऱ्हा पाहून नानाच्या मनांत बाबाविषयीं प्रेमादर वाढला हें सांगणें नलगे.

वर वर्णन केल्याप्रमाणें भिक्षेकरी वेळीं अवेळीं येऊन घरांतील मंडळींना भंडावून सोडतात हा अनुभव बहुतेक घरवाल्यांना नेहमीं येतो. बाबांच्या उपदेशाप्रमाणेंच आमच्या एका व्यवहारचतुर मित्रानें या विषयीं तोडगा सांगितला तो असा, भिकारी लोकांना आपल्या वेळेची किंमत समजते. त्यांना एक दोनच नव्हे तर अनेक घरें फिरून आपलें भिक्षासंपादनाचें काम साधण्याचें असतें. तेव्हां ते आपला वेळ उगाच व्यर्थ दवडीत नाहींत. त्यांचेशीं तक्रार किंवा वाद करीत

राहिल्यास तेहि अनेक धार्मिक युक्त्या, दयामाया इत्यादि कारणें पुढें आणून आपलें काम साधूं पहातात, पण घरचे मालक वाद घालत न बसतां गोड शब्दानें नकार देऊन स्वस्थ बसतील आणि येथें आपणास कांहीं मिळणार नाहीं अशी खात्री पटवून देतील तर भिकारी अशा ठिकाणीं आपला 'अमूल्य' वेळ व्यर्थ न दवडितां पुढें चालते होतात. तेव्हां घरवाल्या मंडळींनीं साईबाबांचा धडा किंवा शिकवण अंमलांत आणून भिकाऱ्यांचीं बोळवण शक्य तर मदत किंवा भिक्षा देऊन, तसें शक्य नसेल तर गोड शब्दांनीं तरी करावी हें योग्य आहे.

**मांगाना दिलेलें दान बाबांना पोंचलें.** (श्रीसाईलीला. व. २, अं. ६ पान २०९). एकदां नानासाहेब शिरडीस आले असतां सूर्यग्रहणाची पर्वणी आली. त्या पर्वणीसाठीं कोपरगांवास गोदावरी स्नानांस जाण्याची त्यांना इच्छा झाली. बाबाची परवानगी घेऊन ते गोदास्नानास कोपरगांवीं गेले. तेथें ग्रहण लागल्यावर ते नदींत स्नानास उतरले असतां 'दे दान, छुटे गिरान' असें ओरडत एक मांग त्यांचेकडे आला. नानांनीं त्याला दोन पावल्या दिल्या. त्याच वेळेला शिरडीस बाबा आनंदराम मारवाड्याला म्हणाले कीं, या पहा दोन पावल्या मला नानांनीं दिल्या असें म्हणून त्यांनीं त्या पावल्या खिशांत घातल्या.

**बाबाचें भूतभविष्य ज्ञान**—(श्रीसाईलीला व. ३ अं. १ पान ३१७) नानासाहेब कलेक्टर साहेबाबरोबर चिटणीस म्हणून फिरतीवर असतांना दोन दिवसांची सुटी असल्यामुळें साहेब मुंबईस गेले व नाना शिरडीस आले. सुटी संपल्यावर नानांनीं कोपरगांवास जावयाचें आणि आपल्या हाताखालच्या मंडळीं-समवेत पुढील मुक्कामीं साहेबाबरोबर जावयाचें असें ठरलें होतें. बाबानीं नानाला सुटी संपताच परत जाण्याची परवानगी दिली नाहीं. एक दिवस अधिक ठेवून घेऊन नंतर त्याला जाऊं दिलें. ऑफिसची मंडळी साहेबाबरोबर पुढील मुक्कामीं गेली असेल अशा समजुतीनें नाना कोपरगांवीं आले, तों सर्व मंडळीं त्यांना तेथेंच आढळली आणि त्यांनीं सांगितलें कीं,—'मी एक दिवस उशीरा येणार आहे, तर ऑफिसच्या मंडळींनीं दुसरें दिवशीं नेमलेल्या मुक्कामीं हजर व्हावे अशी साहेबाची तार आली. अर्थात् बाबांनीं एक दिवस अधिक ठेवून घेतलें तें योग्यच होतें हें नानासाहेबांना पटून आनंद झाला.

**एका मुसलमानाची पेटी**—श्रीसाईलीला व. ४ अं. ६ पान ५३१. एकदां एक मुसलमान बाबांकडे आला आणि दर्शन घेऊन प्रार्थना करूं लागला कीं,—बाबा, सुरंगी दारूचा व बत्त्याचा मला परवाना मिळत नाहीं, मी कलेक्टर साहेबाकडे पुष्कळ अर्ज केले, पण दाद लागत नाहीं, कसेंहि करून मला तो परवाना मिळवून द्या. बाबा म्हणाले कीं—बरें नानाला येऊं दे म्हणजे तुला परवाना द्यावयाला मी त्याला सांगेन. कांहीं दिवसांनीं नाना तेथें आले. तो मुसलमान त्यावेळीं तेथें हजर होता. बाबा म्हणाले—नाना, या मुसलमानाला तो मागत असलेला परवाना दे. नाना म्हणाले कीं—यानें दोन वेळां अर्ज केले, त्याला परवाना

देऊं नये म्हणून कलेक्टरसाहेबांचा हुकूम झालेला आहे, आतां त्याला परवाना मिळणार नाहीं. बाबा म्हणाले–तूं आतां साहेबास सांग म्हणजे तो देईल. या मुसलमानाची एक पेटी आपल्याकडे आहे. ती तो आतां परत मागत आहे. ती त्याला देऊन टाकावी हें योग्य आहे. तेव्हां नानासाहेबानीं त्या मुसलमानास सांगितलें कीं, तूं आणखी एक वेळां अमुक ठिकाणीं अर्ज कर, आणि तुझी सर्व हकीगत साहेबास सांग. त्याप्रमाणें त्यानें तिसऱ्यांदा अर्ज दिला. कलेक्टर साहेबांनीं याबाबत नानाला विचारलें. तेव्हां दोनदां याचा अर्ज नामंजूर झाला आहे तरी फिरून पुनः तो अर्ज करीत आहे. तेव्हां साहेब म्हणाले कीं, या अर्जदारास बत्त्या व सुरंगी दारू कशासाठीं पाहिजे ? तेव्हां त्यानें असा खुलासा केला कीं, सरकारांतून शेतसुधारणेकरितां व त्याची बांधबंदिस्ती करण्याकरितां आपण पांचशे रुपये तगाई घेतलेली आहे. हा परवाना मिळाला नाहीं तर हें काम मुदतशीर होणार नाहीं, शेत पिकणार नाहीं व तगाईचे हप्ते वक्तशीर पोंचणार नाहींत; हें सर्व ऐकतांच साहेबांनीं सांगितलें कीं, ही हकीकत पूर्वी माझ्या नजरेस कां आणली नाहीं, आतांच्याआतां याला परवाना तयार करून द्या. त्याप्रमाणें तो तयार होऊन साहेबाची सही होऊन त्याला मिळाला. पूर्वीं हा मुद्दा कोणाचे लक्षांत आला नाहीं, तो याच खेपेस पुढें कसा आला हें आश्चर्य होय. त्या मुसलमानानें कसली पेटी बाबापाशीं ठेविली होती याचा खुलासा नानासाहेबानीं असा केला कीं, त्यानें पूर्वजन्मीं केव्हांतरी महाराजांच्या जवळ कांहींतरी सत्कृत्य केलें असावें; त्याचें फळ तो आतां या रूपानें मागूं लागला, म्हणून बाबा म्हणाले कीं, त्याचें फल आपण त्यास देऊन टाकूं आणि तें त्यांनीं त्यास या रूपानें दिलें.

**दोन यवन स्त्रिया—"बनतां बनतां बनेल"** (श्रीसाईलीला, व. ४, अं. ६ पान ५३३–३५ आणि श्रीसाईसच्चरित, अध्याय ४९–१४७–१८३). एकदां नानासाहेब, म्हाळसापती इत्यादि भक्त मशीदींत बसले असतां एक विजापूरचा श्रीमान गृहस्थ परिवारासहित बाबांच्या दर्शनासाठीं आला. स्त्रियांचा गोषा पाहून नाना आपल्या मनांत संकोचले आणि त्यांना जागा करून द्यावी म्हणून उठूं लागले. तेव्हां बाबा म्हणाले–येणारे त्यांना वर येऊं द्या; नाना तूं स्वस्थ चित्तानें बैस. त्यानंतर त्या स्त्रिया वर आल्या आणि आपल्या मुखावरील बुरखा दूर करून बाबांच्या चरणीं वंदन करून तेथें बसल्या. त्यांपैकीं एक स्त्री वृद्ध व दुसरी अगदीं तरुण असून फार सुंदर होती. तिचा चेहरा पाहून नाना निजअंतरीं मोहित झाले. लोकांसमक्ष तिच्याकडे पहावें तर पंचाईत, आणि पाहिल्याशिवाय राहवेना, अशी त्यांचे मनाची चलबिचल स्थिती झाली; शिवाय त्यांना बाबांची मोठी लाज वाटूं लागली आणि त्यांना आपलें मुख वर करवेना. त्यावेळीं बाबांनीं नानाला जो उपदेश केला तो ऐकाः—

"नाना किमर्थ गडबडसी मनीं।
ज्याचा निजधर्म तो स्वस्थपणीं॥
आचरतां आड यावें न कोणी।
कांहीं न हानी तयांत॥ १५८॥

ब्रह्मदेव सृष्टी रचितां।
आपण तयाचें कौतुक न करितां।
व्यर्थ होऊं पाहील रसिकता।
'बनतां बनतां बनेल ॥ १५ ॥

असतां पुढील द्वार उघडें।
जावें कां मागील द्वाराकडे ॥
एक शुद्ध अंतर जिकडे।
तेथें न सांकडे कांहीं ही ॥ १६ ॥

कुढा भाव नाहीं अंतरीं।
तयास काय कोणाची चोरी ॥
दृष्टी दृष्टीचें कर्तव्य करी।
भीड मग येथें धरिसी कां ॥ १६१ ॥

बाबा म्हणाले—मन हें जातीचेंच चंचल आहे. तरी आपण त्याला उच्छृंखल होऊं देऊं नये. कांहीं कारणांनीं इंद्रियाची खळबळ झाली तरी शरीर उतावीळ होऊं देऊं नये. इंद्रियांचा विश्वास धरूं नये, आणि विषयांची लालसा बाळगूं नये. याप्रमाणें अभ्यास करतां करतां चित्ताचें चांचल्य हळुहळु नाहींसें होईल (बनतां बनतां बनेल) आपण इंद्रियाचे आधीन केव्हांहि होऊं नये. पण तींहि सर्वथा दाबून ठेवितां येत नाहींत. म्हणून प्रसंगानुसार त्याचें विधिपूर्वक नियमन करावें.

रूप हा तो दृष्टीचा विषय।
सौंदर्य वस्तूचें पहावें निर्भय ॥
तेथें लाजेचें कारण काय।
बावा न ठाव दुर्बुद्धीतें ॥ १७३ ॥

मन करोनिया निर्वासन।
इशकृतीचें करा निरीक्षण ॥
होईल सहज इंद्रिय-दमन।
विषयसेवन-विस्मरण ॥ १७४ ॥

हा सुंदर उपदेश नानासाहेबांना आणि त्यांच्याद्वारें सर्व भक्तांना बाबांनीं केला आहे. त्याप्रमाणें वागल्यास सर्वांचें कल्याण होईल.

## नानाच्या वडिलांची ताकीद

(श्री. साईलीला व ४ अं. ६ पान ५३५–५३८) नानासाहेबांच्या वडिलांचा, कल्याणचे कांहीं मुसलमान लोकांशीं कांहीं बाबतींत बेबनाव झाल्यामुळें आपल्या घरीं त्यांस येऊं द्यावयाचें नाहीं व बोलवावयाचें नाहीं आणि आपल्या घराच्या कोणत्याहि मनुष्यानें त्या कोणाचे घरीं जावयाचें नाहीं अशी ताकीद त्यांनीं घरीं देऊन ठेविली होती. यावेळीं नानासाहेब बाहेरगांवीं नोकरीवर होते. घरीं आल्यावर त्यांना ही ताकीद समजतांच ते मोठ्या पंचाइतींत पडले. ते स्वतः पितृभक्त व पित्राज्ञाधारक होते. पण आपले वडील जुन्या मताचे असून करारी स्वभावाचे होते हें ते पक्के जाणत होते. नानासाहेबाचे कांहीं सहाध्यायी व मित्र मुसलमान होते, त्यांचेशीं एखादे वेळीं संबंध वर्ज्य करितां येईल, पण मुसलमान म्हणून समजले जाणारे गुरु साईबाबा यांचेकडे येणें जाणें कसें बंद करावयाचें? हा मोठा प्रश्न नानासाहेबांपुढें पडला. तेव्हां नानासाहेबानीं मोठ्या धैर्यानें आपल्या अडचणी आपल्या वडिलांपुढें मांडल्या. तेव्हां ते म्हणाले—अरे शिरडीचे साईबाबा हेच तुझे गुरु आहेत. तूं त्यांचेकडे जात जा. हें ऐकून नानासाहेबांना अत्यानंद होऊन त्यांचे डोळे प्रेमाश्रूंनीं भरून आले. बाबांनीं आपल्या वडिलांस ही एवढीच अपवादात्मक प्रेरणा कशी केली ही एक त्यांना बाबांची अतर्क्यलीला वाटली आणि बाबांवरील त्यांची भक्ति व श्रद्धा दृढावली.

**'अतिथि' शब्दाचें स्पष्टीकरण** (श्रीसाईलीला व. ६, अं. १–२ पान ६७०) आपण रोज देवपूजा झाल्यानंतर वैश्वदेव करून बाहेर जाऊन काकबलि टाकितों आणि कांहीं वेळ (गाईची धार काढण्यास लागणारा) शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें अतिथीचें आदरातिथ्य आणि अन्नदानानें सत्कार करावा म्हणून त्यांची वाट पाहतों; पण असा अतिथि क्वचितच मिळतो, तेव्हां शास्त्रांत सांगितलेलें अतिथि विधान बरोबर आहे कीं नाहीं अशी शंका एकदां नानासाहेबांच्या मनांत आली आणि शिरडीस गेल्यावर त्यानी ती बाबास विचारली. बाबानी याचा खुलासा असा केला कीं, अरे अतिथि म्हणजे साडेतीन हात उंचीचा मानव देहधारी ब्राह्मणच असावयास पाहिजे काय? अतिथीची व्याख्या इतकी आकुंचित नाहीं. ज्याचें अंतःकरण भुकेनें व्याकुल झालें आहे आणि ज्याला अन्नाची अतिशय जरूरी आहे असा जो कोणी जीव त्यावेळीं येईल तो अतिथि. मग तो मनुष्य असो, पशु असो, पक्षी किंवा कीडमुंगी असो. हे सर्व जीव अन्नाच्या शोधार्थ दूरदुरून येत असतात. त्यामुळें ते थकले भागलेले असतात आणि त्यांचें अंतःकरण पीडित झालेलें असतें. परंतु तुझें लक्ष त्यांचेकडे असतें कधीं? तुझा असा विपरीत ग्रह झालेला दिसतो कीं, अतिथि म्हणजे औट हाताचा मानव देहधारी ब्राह्मण! असे अतिथि वैश्वदेव करून काकबलि टाकिल्यावर येत नाहींत. पण मी वर सांगितलेले खरे अतिथि त्यावेळीं येतात. पण तूं त्यांना अतिथि म्हणून ओळखीत नाहींस. अतिथि किती तरी लाखों तुझ्या घरीं जेऊन गेले आहेत व जात आहेत, पण यांतील मर्म तुला न समजल्यामुळें अतिथींच्या सत्काराचें व अन्नदानाचें श्रेय तुला मिळत नाहीं. याकरितां या शब्दाचा भलताच व संकुचित अर्थ टाकून दे आणि काकबलि टाकण्याच्या वेळेस बराचसा भात बाहेर नेऊन ठेवीत जा. कोणताहि जीव तो भात खाण्यास आला तर मनांत विकल्प न आणतां तो त्यास खाऊं दे; म्हणजे अनंत अतिथि तुझ्या घरीं जेवल्याचें पुण्य तुला मिळेल.

अतिथि शब्दाच्या, बाबांच्या ह्या विश्वव्यापक अर्थानें नानाची शंका निवृत्ति होऊन त्याचें समाधान झालें आणि बाबांच्या अगाध ज्ञानाचें व अतुल सामर्थ्याचें कौतुक वाटलें. बाबांचें हें स्पष्टीकरण वाचून तसें कौतुक प्रत्येक सहृदय वाचकाला वाटल्याशिवाय राहणार नाहीं.

**पंढरपुरला जायाचें जायाचें**— (श्रीसाईसच्चरित, अ. ७–११० ते १२५) नानासाहेब नंदुरबाराला असतांना त्यांची बदली पंढरपुरास झाली आहे असा हुकूम आला. लवकर पंढरपुरा। जावयाचें होतें म्हणून नानासाहेबानीं तातडीनें सर्व तयारी केली आणि सहकुटुंब सहपरिवार आधीं शिरडीस बाबाचे दर्शनास जाण्याचा विचार करून ते निघाले. कोणास पत्र पाठविलें नाहीं किंवा कोणाबरोबर निरोप धाडला नाहीं. सर्व सामानसुमान आवरून ते लगबगा गाडींत बसले. हें वर्तमान इतरांस समजलें नाहीं, पण तें सर्वसाक्षी बाबांना कळलें. कारण नाना लगबगीनें निमगांवच्या सीमेवर येतात तोंच शिरडींत

काय चमत्कार झाला पहा! मशीदींत बाबा, म्हाळसापति, आप्पा शिंदे, काशीराम इत्यादिकांबरोबर गोष्टी करीत बसले होते. बाबा मध्येंच एकदम म्हणाले उठा, आपण चौघेजण मिळून भजन करूं या. पंढरीचे दरवाजे उघडले आहेत; चला आपण मौजेनें भजन करूं असें म्हणून त्यानीं भजन सुरूं केलें तें असें—

पंढरपुरला जायाचें जायाचें।
तिथेंच मजला राह्याचें ॥
तिथेंच मजला राह्याचें।
राह्याचें। घर तें माझ्या रायाचें ॥

बाबा हें भजन म्हणूं लागले, इतर भक्त त्याचा अनुवाद करूं लागले, आणि सर्वजण पंढरीच्या प्रेमांत रंगून गेले. इतक्यांत नाना सकुटुंब आले आणि बाबांना वंदन करून म्हणूं लागले कीं, आतां आम्हां समवेत महाराजांनीं पंढरपुरांत राहावें. पण अशी विनंति करण्याचें प्रयोजनच नव्हतें; कारण इतर भक्तांनीं बाबांची भजनस्थिति त्यांना सांगितली. ही लीला पाहून नाना आश्चर्यचकित व सद्गदित झाले. पुढें ते आशीर्वचन, उदी व निरोप घेऊन पंढरपुरास गेले.

यापुढील कांहीं अनुभव श्रीसाईलीला, व. १६, अं. १२-३ यांतून घेतलेले आहेत.

**या आजीबाई**—बाबा नानासाहेबांच्या पत्नीला नेहमीं आई म्हणून हांक मारीत. एकदां मशीदींत त्या दर्शनास गेल्या असतां बाबा म्हणाले—या आजीबाई. हें ऐकून आईसाहेबांना आश्चर्य वाटलें. आईच्या ऐवजीं आजीबाई म्हणून कां संबोधिलें हें त्यांना कळेना. बिन्हाडीं गेल्यावर ही हकीकत त्यांनीं नानासाहेबांस कळविली. तेव्हां त्यांनीं चटकन् सांगितलें कीं, अग आपली द्वारका बाळंत झाली असली पाहिजे. त्यांची धाकटी कन्या सौ. द्वारकाताई इचा प्रसूतिसमय अगदीं समीप आला होता आणि त्यामुळें त्या काळजींत होत्या. दुसरे दिवशीं तिच्या प्रसूतीचें पत्र आलें, बाबांनीं जेव्हां आजीबाई असें संबोधिलें होतें, त्याच वेळीं सौ. द्वारकाताई बाळंत झाल्या होत्या. यावरून बाबांचें सर्वसाक्षि—ज्ञान किती अगाध होतें आणि वाणी किती अर्थपूर्ण होती हें दिसून आलें.

## माझी आई दळदळ दळती, पण समदच भरड !

नानासाहेबांच्या उपदेशाप्रमाणें आईसाहेब नेहमींच जप करीत असत. त्या एकदां पतिसमवेत शिरडीस गेल्या आणि बाबांना वंदन करून जवळ बसल्या. तेव्हां बाबा म्हणाले—'माझी आई दळदळ दळती, पण आई समद भरड बरं कां! आईसाहेबांना या म्हणण्याचा अर्थ समजला नाहीं. बिन्हाडीं गेल्यावर त्यांनीं ही हकीकत नानासाहेबांस सांगितली. तेव्हां ते म्हणाले—'अग खरंच—तूं पुष्कळ जप करतेस खरी, पण तुझें लक्ष्य दुसरीकडे कुठें तरी असतें. लक्ष्यपूर्वक जप केला पाहिजे. (तज्जपस्तदर्थ—भावनम्) नुसती तोंडानें अक्षरें पुटपुटण्यांत काय फायदा? त्यानंतर त्या लक्ष्यपूर्वक जप करूं लागल्या.

**तुमचीं कामें चालू द्या, आम्हीं कांहीं आतां मरत नाहीं**—१९१२ सालची गोष्ट असावी. त्यावेळीं

बाबा अत्यंत आजारी पडले आणि त्या दुखण्यांतून ते बरे होतील असें कोणास वाटेना. नानासाहेबानीं बहुतेक साई-भक्तांना ही हकीकत कळविली. त्याप्रमाणें पुष्कळ मंडळी तेथें आली. आणि बाबांना त्या दुखण्यांत आराम पडून अरिष्ट शांत व्हावें म्हणून जप, वेद, मंत्र पाठ, लघुरुद्र चंडीपाठ इत्यादि अनुष्ठानें सुरू करणेंत आलीं. एक दिवस असा आला कीं दुखण्याचा जोर फार वाढला आणि बाबा लवकरच इहलोक सोडून जातात कीं काय असें प्रत्येकास वाटूं लागलें. तेव्हां दीक्षिताच्या वाड्यांत काकासाहेब दीक्षित, बापूसाहेब जोग बाळासाहेब भाटे, तात्या पाटील, कोते वगैरे मंडळीचा असा विचार ठरला कीं या दुखण्यांत बाबांचें जर का कांहीं बरें वाईट होईल तर त्यांचें शव दरग्यांत न्यावयाचें किंवा त्यांना वाड्यांत समाधि द्यावयाची हें आतांच बाबांकडून निश्चित करून घेतल्यास पुढें हिंदु-मुसलमानांत लढा पडणार नाहीं.

पण बाबांना हें विचारावें कसें आणि कोणी? विचार करितां करितां नानासाहेबांनीं हें काम करावें असा सर्व मंडळीचा आग्रह पडला. पण ते म्हणाले कीं—मी हें कसें विचारूं? इतक्यांत बाबांकडून एक मनुष्य नानासाहेबांची चौकशी करीत दीक्षिताच्या वाड्यांत आला आणि नानासाहेब तेथें आहेत असें पाहून त्यानें बाबांचा असा निरोप सांगितला कीं, आमच्या मरणाची चवकशी आतांच करूं नका. आम्हीं आतां मरत नाहीं. तुमचें चाललेलें काम अनुष्ठान वगैरे तुम्ही पुरें करा इत्यादि. हें ऐकून बाबांच्या सर्व व्यापकत्वाबद्दल सर्वांना आश्चर्य वाटलें. पुढें सर्व अनुष्ठानें यथासांग पार पडलीं आणि बाबांना आराम पडला आणि जमलेल्या सर्व मंडळीस नानासाहेबांनीं शिऱ्याचें भंडार भोजन दिलें.

**गळूचें आपरेशन.** एकदां नानासाहेबाच्या ढुंगणावर एक मोठें गळूं झालें आणि त्यापासून त्यांना बराच त्रास होऊं लागला. पुष्कळ उपचार केले, पण कशानेंहि गुण येईना. नेहमीं कांहीं झालें तरी नानासाहेबाची फिर्याद बाबांकडे जावयाची, पण या खेपेस त्यांनीं निश्चय केला कीं, कांहीं होवो, मी बाबांवर संकट घालणार नाहीं. त्याप्रमाणें त्यांनीं डॉक्टर वैद्य यांचे उपाय करून पाहिले शेवटीं मुंबईस जाऊन चांगल्या सर्जनकडून ऑपरेशन करून घ्यावें असें सर्वानुमतें ठरवून ते एके दिवशीं कल्याणहून मुंबईस आले व तेथें आपल्या बिऱ्हाडांतील खोलींत खाटेवर विव्हळत पडले. दुसऱ्या दिवशीं सकाळीं येतों असें सांगून आपरेशनची सामुग्री तयार करून सर्जन निघून गेले. नानासाहेबाना इतकी धास्ती वाटली कीं, आपण यांतून आतां वाचत नाहीं. शेवटीं ठरलेल्या वेळीं बाबांची छबी उशापाशीं घेऊन ते निजले असतां त्यांना एकसारखी तळमळ लागली आणि धडकी भरली. सर्जन येण्यास १०—१५ मिनिटें राहिली. इतक्यांत एक मोठा चमत्कार झाला. नानासाहेब गळवाची बाजू वर करून अनाच्छादित निजले असतां एकाएकीं वरून एक कौलाचा तुकडा नेमका त्या गळवावर पडली. आणि तें फुटून त्यांतून पूं व रक्त वाहूं लागलें. त्यामुळें नानासाहेबांना अत्यंत सुख वाटलें, सर्जन येऊन पाहतात तों त्यांना झालेल्या

प्रकाराबद्दल आश्चर्य वाटलें आणि आतां शस्त्र क्रियेची जरूरी नाहीं असें सांगून ते निघून गेले. यानंतर कांहीं दिवसांनीं नानासाहेब शिरडीस दर्शनास गेलेवेळीं बाबा म्हणाले—आम्हास त्रास द्यावयाचा नाहीं, तरी पण मलाच हात घालून तें गळूं फोडावें लागलें. काय हे गुरूमाऊलीचे उपकार, प्रेम, व्याप्ती, अगम्य ज्ञान व सामर्थ्य !

## बाबांचा नानाला गीतोपदेश

(श्रीसाईलीला, व. ४ अंक १३, आणि श्रीसाईसच्चरित अ. ३९ व ५०)

बाबाचें खरें (मूळ) नांव काय, त्यांची जात कोणती, त्यांचें मूळगांव कोणतें, इत्यादि विषयीं कोणास नक्की माहिती नाहीं आणि बाबांनीहि याविषयीं कांहीं माहिती सांगितली नाहीं. यामुळें त्यांचेविषयीं अनेक लोक तर्कवितर्क लढवीत असतात पण त्याविषयीं येथें आम्हीं कांहीं सांगू इच्छीत नाहीं. येथें एवढेंच सांगत आहो की बाबा हे संस्कृतज्ञहि होते, यानीं सर्व गीता नानासाहेबास संक्षेप रूपानें पण व्याकरण दृष्टया सांगितली असें सांगतात. यासंबंधी एक प्रसंग वर्णन करण्यांत आलेला आहे, तो असाः—

एकदां नानासाहेब मशीदींत बसून बाबाचे चरण संवाहन करीत बसले असतां तोंडानें कांहीं गुणगुणत होते. तेव्हां बाबा म्हणाले कीं—नाना तूं काय गुणगुणतो आहेस ? नाना उत्तरले कीं, मी एक संस्कृत श्लोक गुणगुणत आहे. बाबा म्हणाले कीं, तो मोठ्यानें म्हण, तेव्हां नानांनीं—'तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया । उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्वदर्शिनः ॥ गीता. ४,३४) तेव्हां बाबा म्हणाले की, नाना याचा अर्थ सांग पाहूं. नाना बहुश्रुत, संस्कृत त्यांचा आवडता विषय, आणि त्यांत वेदांताचें व गीता भाष्याचें चांगलें परिशीलन केलेले असे होते. त्यांनी त्या श्लोकाचा अर्थ सांगितला. तो थोडक्यांत असा—तत्त्ववेत्ते ज्ञानी त्यांना प्रणिपात केल्यानें, पुनः पुनः प्रश्न केल्यानें आणि त्यांची सेवा केल्यानें ते तुला ज्ञान उपदेशतील हें लक्ष्यांत ठेव. बाबा म्हणाले कीं प्रत्येक पदाचा अर्थ सांग, त्याप्रमाणें नानानीं प्रत्येक पदाचाहि अर्थ सांगितला, तेव्हां—बाबा म्हणाले, तृतीय चरणांतील 'ज्ञान' या पदा ऐवजीं तेथें दुसरें कांहीं पद निघतें का ? विचार करून नाना म्हणाले, निघतें. बाबा म्हणाले. तें कोणतें ? नाना म्हणाले—अज्ञान. बाबा म्हणाले—'अज्ञान' हें पद घेऊन अर्थ लागतो का ? नाना म्हणाले 'नाहीं. शांकरभाष्य, आनंदागिरी शंकरानंदी, श्रीधरी, मधुसुदनी, नीलकंठी, ज्ञानेश्वरी वगैरे टीकांत ज्ञान हेंच पद घेऊन अर्थ लाविलेला आहे. त्यावर बाबा म्हणाले, याचा पूर्वी केलेला अर्थ असत्य व निरर्थक आहे असें मानू नका. तो सर्वांना मान्य आहे हें मला ठाऊक आहे, पण 'ज्ञान' शब्दाच्या ऐवजीं 'अज्ञान' शब्द घेऊन अर्थ लावून पहा, कसा यथार्थ प्रबोध होतो तो. ज्ञान बोलाचा विषय नसल्यामुळें तें उपदेश होत नाहीं. 'अज्ञान' हा वाणीचा विषय आहे. 'ज्ञान' हें शब्दातीत आहे. म्हणून 'अज्ञान' उपदेश करून, स्पष्ट सांगून तें घालविणें हेंच ज्ञान. अज्ञाननाशापेक्षां ज्ञान म्हणून आणखी कांहीं निराळी वस्तु आहे काय ? तिमिरनाश म्हणजे प्रकाश

द्वैतनाश म्हणजे अद्वैत, तसें अज्ञाननाश म्हणजे ज्ञान. वार जशी गर्भाला, मल जसा आरशाला, राख जशी अग्नीला किंवा शेवाळ जसें पाण्याला वेष्टून असतें तसें अज्ञानानें ज्ञान आच्छादित असतें (अज्ञानेनावृतं ज्ञानं-गीता ५. १५) आणि वरचें आवरण काढून घेतलें म्हणजे आंतील वस्तु प्रगट किंवा गोचर होते.

विश्वाचें सत्यत्व महा भ्रम ।
हेंचि ज्ञानावरण तम ।
निरसूनि जावें लागे प्रथम ।
प्रज्ञान ब्रह्म प्रगटे तैं ॥ ६८ ॥

संसारबीज जें अज्ञान ।
डोळां पडतां गुरुकृपांजन ।
उडे मायेचें आवरण ।
उरें तें ज्ञान स्वाभाविक ॥ ६९ ॥

देवां भक्तां जें भिन्नपण ।
हेंच मूळ अज्ञान विलक्षण ।
तया अज्ञानाचें निरसन ।
होतांच पूर्ण ज्ञान उरे ॥ ७० ॥

\+ + +

सारांश समूळ अज्ञान खाणा ।
उरे तें ज्ञान सिद्ध जाणा ।
ऐसें या श्लोकाचें हृद्गत अर्जुना ।
श्रीकृष्णराणा सूचवी ॥

श्रीसाईसच्चरित ३९-९८ ॥

याविषयीं विस्तृत विवेचन कोणास हवें असेल तर त्यांनीं श्रीसाईसच्चरितांतील वर नमूद केलेले दोन अध्याय आणि श्रीसाई-लीलेचा व ४, अंक १३ वाचावें. आम्हांस येथें थोडक्यांत स्पष्ट सांगावयाचें कीं, बाबांनीं सुचवलेलें 'अज्ञान' पद, त्याची ज्ञानपदाशीं सांगड घालून सुचविलेला अर्थ, अत्यंत मार्मिक, अपूर्व व मौल्यवान आहे यांत शंका नाहीं.

## उपसंहार—

नानासाहेबांची बाबांवर उत्युत्कट भक्ति व अमर्याद प्रेम होतें. बाबांनीं वेळीं अवेळीं मागितलेली दक्षिणा ते मोठ्या प्रेमानें देत आणि 'नाहीं' म्हणण्याचा प्रसंग येऊं नये म्हणून शक्य तितकी काळजी घेत. शिवाय बाबांनीं मारवाड्यांकडून जे जे जिन्नस आणावे त्याची सर्व पैन पै बिलें नानाच देत असत. इतकेंच नव्हे तर इतर भक्तांसाठीं शिरडीस पूर्व-कालीं मोठमोठे तंबू ठोकून सर्वांची राहण्याची व जेवणा-खाण्याची सोय त्यांनीं केली होती. आपला पुतण्या बाळाभाऊ चांदोरकर यांना शिरडीस एक लहानसें घर घेऊन देऊन त्यांत त्यांना सहकुटुंब ठेवून व टांगाहि देऊन खानावळीची व्यवस्था करून दिली होती. पुढें इतर वाडे होऊन भक्तांची सोय झाली आणि आतांहि अनेक वाडे इमारती होऊन अनेक भक्तवृंदाची सोय होत आहे. नानासाहेबांनीं जी हीं भक्तांच्या सेवेची व सोयीची कामगिरी सुरू केली ती मुळें त्यांना अलोट पुण्य-प्राप्ति झाली आणि हजारों भक्तांचा दुवा मिळाला आणि देवाची (बाबांची) प्राप्ति होऊन ते कृतकृत्य झाले यांत शंका नाहीं. बाबांनींहि त्यांना स्पष्ट सांगितलें होतें कीं संसारा संबंधीं तूं कांहीं मागशील तर तें मजपाशीं नाहीं, तें तुला तुझ्या पूर्वकर्मानुसार मिळेल. परमार्था संबंधीं मार्ग तुला हवा असल्यास तो मी दाखवीन. नानासाहेबांनीं ही गोष्ट मोठ्या आनंदानें कबूल केली. त्याप्रमाणें

बाबांनीं नानाला जें कांहीं परमार्थांतील धडे आणि शिकवण दिली त्यांतला कांहीं भाग वर गोष्टीरूपानें दिलेलाच आहे. शिवाय ही शिकवण श्री दासगणू महाराजांनीं आपल्या भक्तलीलामृत (अध्याय ३२ व, ३३) व संतकथामृत (अध्याय ५७) या ग्रंथांत आपल्या प्रासादिक व मधुर वाणीनें वर्णिली आहे आणि हा एवढाच भाग श्रीसाईलीला वर्ष १७, अंक ११-१२ यांत छापून प्रसिद्ध केला आहे. बाबांची ही परमार्थ शिकवण वाचून मनन निदिध्यासन करून वाचकांनीं कृतार्थ व्हावें अशी शिफारस करून आणि बाबाहि त्यांना या कामीं मदत करोत आणि सर्वांना सुखशांति देवोत अशी त्यांची प्रार्थना करून बरेंच लांबलेलें हें प्रकरण पुरें करितों.

श्रीसाईनाथार्पणमस्तु.

---


## श्रीसाईबाबा शिरडी संस्थानांत विक्रीस असलेलीं पुस्तकें

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित | (मराठी) | किंमत | रु. | ७–०–० |
| (२) | सच्चरित | (इंग्रजी) | ,, | ,, | ४–०–० |
| (३) | दासगणूकृत श्रीसाईनाथ–स्तवनमंजरी | | ,, | ,, | ०–२–० |
| (४) | ,, | (अध्याय ४) | ,, | ,, | ०–८–० |
| (५) | सगुणोपासना | | | | ०–३–० |
| (६) | प्रधानकृत पुस्तक | (A glimpse of Indian spirituality) | ,, | ,, | १०–०– |
| (७) | श्री साई–लीलामृत | | ,, | ,, | २–०–० |
| (८) | श्री साई–सुमनांजली | | ,, | ,, | ०–१–० |
| (९) | कीर्तन–पंचक | (श्री साईलीलांनीं नटलेलें) | ,, | ,, | १–८–० |
| (१०) | शीलधी | (शिरडी वर्णन) | ,, | ,, | ०-१२-० |
| (११) | श्रीसाईबाबा–अवतार व कार्य | | ,, | ,, | २–०–० |
| (१२) | श्रीसाई गीतांजली | | ,, | ,, | ०–२–० |
| (१३) | हिंदी श्रीसाईसच्चरित | | ,, | ,, | ४–८–० |

**वरील पुस्तकें खालील पत्त्यावर मिळतील:—**

(१) सर कारकून, श्रीसाईबाबा शिरडी संस्थान, पोस्ट–शिरडी, जि. अहमदनगर.

(२) श्रीसाईबाबा शिरडी संस्थान, मुंबई ऑफिस : ईस्ट ॲंड वेस्ट इं. कंपनी बिल्डिंग, ४९।५५ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई. १

# श्रीदासगणू महाराज आणि कान्ह्या भिल्ल

संतचरित्रांमध्यें अनेकदां कादंबरीपेक्षांहि अद्भुत अशा अनेक घटना घडलेल्या आढळून येतात. अशा मनोवेधक प्रसंगांच्या कथा श्रीसाईलीलेंत देण्याचे आम्ही योजिलें आहे. श्रीसाईबाबांचे परमभक्त श्रीदासगणूमहाराज यांच्या चरित्रांतील एक रोमहर्षण प्रसंग या अंकीं देत आहोंत.

कान्ह्या भिल्ल म्हणून एक दरवडेखोर सन १८९८ चे सुमारास बराच माजला होता. त्याला धरण्याकरितां मोंगलाईतील व इंग्रजीतील पोलिसांनीं आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली, पण त्या सर्वांच्या हातावर तुरी देऊन कान्ह्यानें आपला धुडावा चालूच ठेवला होता. त्यानें अनेक गांवें लुटलीं. शेठ सावकारांचे बळी घेतले. कित्येकांचीं नाकें कापलीं. पोलिसांच्याहि रक्ताचे पाट वाहविले. पूर्वसूचना देऊन दिवसाढवळ्या दरोडे घातले. लोकांचे जीवित वा वित्त भरवंशाचें उरलें नाहीं. या कान्ह्याला पकडण्यासाठीं सरकारनें गुप्त हेर नेमण्याचें ठरवून बऱ्याच ठिकाणांहून हुषार शिपायांचीं नांवें मागितलीं.

त्यावेळच्या एका पोलिस अधिकाऱ्याचें व दासगणूंचें थोडें वितुष्ट होतें. त्यानें दासगणूंचें नांव वर कळवलें आणि या धोक्याच्या कामावर हटकून नेमणूक व्हावी, या हेतूनें 'गणेश दत्तात्रय हा चाणाक्ष शिपाई असून गुन्ह्याचा तपास फार चांगला करतो' असें आपलें प्रशस्तिपत्रहि जोडलें. त्याप्रमाणें 'कांहीं गुप्त कामावर तुमची नेमणूक केली असून आपलें काम हाताखालच्या शिपायांवर सोंपवून नगरच्या मुख्य पोलिस कचेरींत दाखल व्हावें' अशी दासगणूंना आज्ञा झाली. हें धोक्याचें काम आपणांकडे येऊं नये म्हणून त्यांनीं पुष्कळ खटपट केली; पण उपयोग न होतां गुप्त हेर म्हणून कान्ह्याच्या तपासासाठीं जावेंच लागलें.

पाथर्डीपासून १०-११ कोस दूर असलेल्या मोंगलाईतील लोणी या गांवीं रामदासाच्या वेषांत ते येऊन राहिले. लोणीच्या गंगाराम पाटलाशीं कान्ह्याचा संबंध आहे, अशी कुणकुण असल्यानें या भागांत शोध करण्याची आज्ञा श्री. दासगणूंना झाली होती. रामदासी वेषाकरितां आवश्यक असलेलें, कुबडी, रामनामी चिपळ्या, दासबोध, ज्ञानेश्वरी, पांढऱ्या चोंगळ्या इत्यादि साहित्य त्यांना सरकारी खर्चानें मिळालें. सद्गुरूपदेशामुळें मी रामदास झालोंच आहे, तेव्हां सोंग

घ्यावयाचें असेल तर तें त्यांतल्या त्यांत खरें असावें; या कल्पनेनें रामदासी वेष दासगणूंनीं पत्करला होता.

लोणी हें गांव जरा डोंगराळ भागांत आहे. गांवाभोंवतीं थोडी झाडी असून जवळच पाण्याचा खळखळ वाहाणारा ओढा होता. गांवांत एक लहानसें राम-मंदिर आहे. पुढें सोप्यासारखे पांच खण व मागें छोटासा गाभारा, आंत एका ओट्यावर रामरायाच्या वनवासी वेषांतील काळ्या शिळेच्या लहानशा मूर्ति. अगदीं साध्या मांडणीचें माळवदी घरवजा तें मंदिर होतें. याच ठिकाणीं श्रीदासगणू-छे ! आतां रामदासी बुवा येऊन उतरले.

मंदिर जुनें असून कितीतरी दिवसांत त्याकडे कोणींही लक्ष दिलें नव्हतें. याची साक्ष सर्वत्र पसरलेला केर, पाचोळा, पाकोळ्यांची उबट घाण, आढ्याला लोंबणारीं मळकट जळमटें पाहून पटण्या-सारखी होती. अशा स्थितींत देवाची पूजा कित्येक दिवसांत झाली नव्हती, हें सांगण्याची गरज नाहीं. देवापुढें कांहीं उत्पन्न नसल्यामुळें पुजाऱ्याला रामसेवेची स्फूर्ति कशी व्हावी ! निःस्वार्थपणें परमार्थ करणारे किती आढळणार ! "सर्वः स्वात्मवशात् जनोऽभिरमते कस्यास्ति को वल्लभः" हें सर्वथा सत्य आहे.

मंदिराची अशी ही दैना व राममूर्तिची अनास्था पाहून दासगणूंना मनापासून वाईट वाटलें. त्यांचे डोळे भरून आले. श्रीरामाच्या पायावर मस्तक नमवीत ते म्हणाले, "रामराया, आपल्या मागें सदाचाच वनवास, का हो !" स्वतः पांचसहा तास खपून त्यांनीं पाकोळ्यांची घरटीं, केरकचरा झाडून झटकून सर्व मंदिर स्वच्छ केलें. शेण आणून सारवूनहि टाकलें. वाण्याकडून ऊद आणुन त्या ठिकाणी जाळला. आतां त्या स्थानाला थोडें तरी मंदिराचें रूप आलें. प्रभू रामचंद्राची पूजा करणें, हा दासगणूंच्या भाविक हृदयाला अत्यंत आनंद देणारा व्यवसाय होता. अगदीं मनापासू ते तास न् तास त्यांत रममाण होत. गुप्त वेशांत असूनही याकामीं कृत्रिमतेचा लवलेशही नव्हता. ओढ्यावर जाऊन रानकण्हेरीचीं बरींचशीं तांबडीं फुलें वेंचून आणावीं आणि त्यांच्या माळा गुंफून दाशरथीला अर्पण कराव्या. पवमान, रुद्राचीं आवर्तनें म्हणत अभिषेक करावा. स्वयंपाक करू : नैवेद्य समर्पावा. दुपारीं विष्णु सहस्रनामाचे बारा पाठ म्हणावे व संध्याकाळीं दासबोध, ज्ञानेश्वरी वाचावी. रात्रीं भजन करून निद्रा घ्यावी. दिवसभर याच पारमार्थिक कार्यक्रमांत देव देव करीत मग्न असावें कोणाशीं विशेष बोलू नये. अन्य कोठें जाऊं नये. समोर सरळ पाहात ओढ्यावर जाऊन स्नान करावें व सरळ परत मंदिरांत येऊन बसावें.

अशा रीतीनें कांहीं दिवस लोटले. हळुहळु देवळांत दर्शनाकरितां, पोथी ऐकण्यासाठीं वा भजनकीर्तनाला बरीच मंडळी येऊं लागली. रामापुढें कांहीं धान्य, खारका, शेंगा, गूळ असे पदार्थ येऊं लागले. क्वचित् पैसेही येत. रामदासी बुवांनीं, खारका, गूळ, शेंगा ठेऊन घ्याव्या आणि धान्य व पैसे देवळाचा पुजारी बाळंभट यास नेण्यास सांगावें. अर्थात्च रामदासीबुवांविषयीं बरेंच कुतूहल निर्माण होऊन गांवकऱ्यांत

नानाप्रकारचे तर्क वितर्क होऊं लागले. कोणी म्हणे, ‘ हा खराच रामदासी आहे.’ दुसरा म्हणे, ‘ असेल कोणी लुचा ! तोंड चुकवून येथें येऊन राहिला आहे ! ’ कोणी म्हणे, ‘ हा पोलिसचा गुप्त हेर असावा ! ’ त्यांत हा खराच रामदासी आहे, असें म्हणणाऱ्यांची बहुसंख्या होती. ते म्हणत, ‘ पोलिसाला किंवा एकाद्या लुच्च्या चोराला पवमान, रुद्र कोठून येईल ? ज्ञानेश्वरी, दासबोध कसा कळेल ? हा तर अहोरात्र देवदेव करीत असतो. किती भाविकपणानें देवाचें करतो पहा ना ! किती घाण होतें हें मंदिर ? आतां येथें आलें कीं कसें बरें वाटतें ! खरोखरच हा साधुवृत्तीचा असल्यावांचून इतकी शांति निस्पृहपणा कसा असेल ? ’ लोकांची रामदासीबुवांविषयींची भक्ति हळुहळू वाढत गेली. तरीपण हा गुप्त हेर असावा, असें म्हणणारीं दोनचार माणसें होतींच. त्यांपैकीं अंताजीपंत कुळकर्ण्यानें तरी बुवाचा ठाव घेण्याच्या दृष्टीनें आपल्याकडून बराच प्रयत्न केला.

‘ काय बुवा, ठीक चाललें आहे ना ? कांहीं अडचण असेल तर सांगा हो ! आम्ही तुमचेच आहों. तुम्हांला लागेल तें साहाय्य करण्याविषयीं तुमच्या वरिष्ठ पोलिस कचेरींतून लिहून आलें आहे.’

‘ तुमचा कांहीं घोटाळा झालेला दिसतो आहे, अंताजीपंत. पोलिसकचेरीचा आणि माझा काय संबंध ? मला रामदाशाला गरज ती कशाची लागणार ? माझा रामराय समर्थ आहे.’

कुळकर्ण्यांच्या मनांतील संशय नाहींसा झाला नाहीं. पण बुवा पक्का आहे, त्यापुढें आपली मात्रा चालणार नाहीं, हें मात्र तो समजून गेला.

रामदासीबुवांनीं माहिती मिळवण्याचा प्रयत्न करीत असतांना फारच सावधपणा ठेवला होता. संध्याकाळीं रानांतून आल्यावर गुराखी मुलें देवळांत जमत. रामापुढें आलेल्या पदार्थांतून वगळून ठेवलेल्या खारका, शेंगा, गूळ या वस्तु मुलांना वाटल्या जात. बुवा या पोरांशीं मात्र मोकळेपणानें बोलत. ‘ आज तुझीं गुरें कोणत्या डोंगरावर गेलीं होतीं ? तिकडे लांडग्यांची भीति आहे का ? तुझीं गुरें किती ? दूध किती निघतें ? ’ अशा आस्थेनें विचारपूस करणारा मिळाल्यावर मुलें मोठ्या प्रेमानें सर्व सांगत. क्वचित् एखाद्या दिवशीं ‘ गांवचा पाटील कोण आहे ? गांवांत प्रमुख माणसें कोण ? हे काळे पोलिस कशाला येतात ? ’ असें विचारावें. मोकळ्या मनाचीं मुलें सर्व माहिती देत. ‘ कान्ह्या भिल्ल गंगाराम पाटलाकडे येतो. त्याला धरण्यास हे शिपायी येतात. ’ इत्यादि गोष्टी मुलें सांगत.

एक दिवस बुवांनीं गंगाराम पाटलांच्या मुलाचा हात सहज पाहिला आणि ऐकींव माहितीच्या आधारावर त्याला म्हटलें, “ तुला दोन आया आहेत. नाहीं रे ! तुम्ही तीन भावंडें. तुझ्या थोरल्या बहिणीचं लग्न झालंय, होय ना ? ” मुलाला हें ऐकून मोठें नवल वाटलें, त्यानें हें वृत्त बापास जाऊन सांगितलें. हात पाहून ज्योतिष सांगणारा भेटल्यावर ‘ माझा हात पाहा ’ असें कोण म्हणणार नाहीं ! साधारणपणें तो एक नादच असतो माणसांना !

दुसऱ्या दिवशीं गंगाराम पाटील राम-मंदिरांत आले. 'माझा हात बघा कीं जरा' अशी त्यांनीं बुवांना विनंति केली. बुवांनीं प्रथम आढेवेढे घेतले. दुसरेच विषय काढले. शेवटीं 'उद्यां सकाळीं या, मग हात पाहतों ?' असें सांगितलें. बुवांच्या बोलण्याचालण्यांतील गंभीरपणाचा पाटलांच्या मनावर फारच चांगला परिणाम झाला. दुसरे दिवशीं सकाळींच पाटील बुवांच्याकडे आले. बुवांनीं बराच वेळ त्या हातावरील बुध, गुरू, शुक्र यांचे उंचवटे पाहिले. आडव्या उभ्या रेषांचें जाळें निरखिलें. निरानिराळ्या बोटांवरचीं व मुठीवरचीं इतर चिन्हें हात पालथा उताणा करून न्याहाळलीं. शेवटीं, 'चांगला आहे कीं पाटील तुमचा हात' एवढेंच सांगून ते स्वस्थ राहिले. एवढ्यानें ऐकणाऱ्याच्या मनाचे समाधान कसें होणार! पाटलांनीं 'असें काय! नीट सांगा ना महाराज!' असें पुन्हां पुन्हां विनवल्यावर बुवा हळूच म्हणाले, 'पाटील, तुम्हांला संतति, संपत्ति चांगली आहे. संसारसुखहि लागेल. पण तुम्हांला होणारा द्रव्यलाभ चोरांपासून होईल वा झाला असेल. चांगल्या मार्गानें नाहीं.' ही अंतरींची खूण पाटलांना चांगलीच पटली. त्यांची दृढश्रद्धा रामदासी बुवांवर बसली.

आतां पाटलांच्या घरून दोन्ही वेळां बुवांकरितां गाईचें दूध येऊं लागलें. देवा-पुढचें धान्य नी पैसे मिळत असल्यामुळें संतुष्ट झालेला बाळंभट पुजारी हा दशम्या करून आणून देत असे. यामुळें खाण्यापिण्याची पंचाईत नाहींशी झाली. गांवांत मानसन्मानही बराच वाढला. पांच पंचवीस नमस्कार घेण्याकरितां थांबल्यावांचून रस्त्यानें जाणें कठीण झालें. भजन व पोथी यांना दाटी होऊं लागली. एकंदरींत रामदासबुवा हे खरे साधू, साक्षात्कारी संत आहेत, अशी लोकांची भावना झाली. अंतोबा कुळ-कर्ण्याच्या मनांतील अविश्वासही डळमळला.

कान्ह्यानें त्याच्या मार्गावर असणाऱ्यांची हत्या किती अमानुषपणें केली, त्या भयंकर वार्ताही कानावर येत. श्रीदासगणूंच्या सर्वेच गुप्त हेर म्हणून नेमलेल्या दोघांस कान्ह्यानें यमदसनास पाठवल्याचें समजलें होतें. त्यांतील मलकप्पा नागप्पा या वाघ्याच्या वेषानें हिंडणाऱ्या शिपायास तर कान्ह्यानें कुऱ्हाडीनें सरपणासारखा तोडला होता. मृत्यूची ही धाड केव्हां कोसळेल, याचा मुळींच नेम नसल्यानें जीव नेहमीं टांगणीला लागल्यासारखा असे. लोकांची फसवणूक करावी लागते आहे नी मरणाची तलवार सदैव डोक्यावर टांगलेली आहे; याला कारण ही पोलीसची नोकरी. बुवांनीं प्रत्यहीं देवाची प्रार्थना करावी, कीं—

नको नोकरी ही मला पोलिसाची ।
बहू भ्रष्टवी कष्टवी चित्त साची ।।
मला त्यांतुनीं सत्वरीं सोडवावें ।
रमानायका, चित्ति माझ्या वसावें ।।

एक दिवस कान्ह्या भिल्ल गंगाराम पाटलाकडे रात्रीचा आला आणि त्यानें पाटलास विचारलें—

'तो रामदासी कोण आहे, पाटील?'

'तो चांगला साधु आहे. नाईक त्याला मुळींच त्रास देऊं नका.'

'साफ खोटें! तो पोलिस आहे. मी पक्की माहिती काढली आहे. चला आपण त्याच्याकडे जाऊं.'

दोघेजण राममंदिरांत आले. कान्ह्याच्या हातांत दारू ठांसलेली तोड्याची बंदूक होती. पाटलांनीं बुवांना जागें केलें.

कान्ह्याची ती काळी कुळकुळीत, पिळदार बांध्याची, ठेंगणी, उग्र मुद्रा असलेली, पुष्ट शरीराकृति पाहतांच बुवांचें धाबें दणाणलें. प्रत्यक्ष काळ मृत्युपाश घेऊन उभा आहे, असें वाटलें. भीतीनें जिवाचा थरकांप थरकांप झाला. कान्ह्यानें दरडावून विचारलें, 'कोण आहेस तूं? तुझें नांव गणेश दत्तात्रय सहस्रबुद्धे. तुझा बक्कल नंबर ७२७ खरें आहे कीं नाहीं? बोल!'

कान्ह्यानें बित्तं बातमी मिळवलेली पाहून बुवा त्याहि स्थितींत आश्चर्यानें थक्क झाले. आपल्या जोडीदाराची याच दरोडेखोरानें नुकतीच काय दशा केली आहे, तेंहीं आठवलें. जीविताची उरली सुरली आशा ही नष्ट झाली. तोंड भीतिनें कोरडें पडलें. छाती धडधडूं लागली. मुखावाटे शब्द उमटेना. कान्ह्यानें पुन्हां दरडावतांच दासगणू चांचरत अडखळत म्हणाले, 'बाबा, मी वाई साताऱ्या कडला पांडव वाडीचा राहणारा आहे. तूं हें पोलीस बिलीस काय म्हणतोस हें मला माहीत नाहीं. समर्थांच्या जन्मभूमीचें दर्शन घ्यावें म्हणून जांबेस गेलों. परत येतांना आमच्या गांवाकडे प्लेग असल्याचें कळलें म्हणून येथें राहिलों. माझें आयुष्यच सरलें असलें तर तूं काय करणार? मार तुझ्या मनांत आहे तर. मी आंत जाऊन रामाच्या पायावर डोकं ठेवतों. मागून तुझी बंदूक चालव." असें म्हणून कान्ह्याच्या होय, नाहीं, म्हणण्याची वाट न पहातां रामदासीबुवा भरदिशीं गाभाऱ्यांत आले. प्रभु रामचंद्रास घट्ट मिठी मारली आणि दीनपणें म्हणाले, "रामा, तुझ्या पदरांत आहें. योग्य वाटेल तें कर." पायांवर मस्तक टेकलें व बुवांचें भान हरपल्यासारखें झालें; अत्यंत भयानें थोडी मूर्च्छांच आली म्हणा ना!

मृत्यूच्या भीतिनें मिठी मारलेल्या मार्कंडयास यमपाशांतून सोडणारे भगवान् शंकर ज्याचें ध्यान प्रेमानें करतात तो जानकीपति रामराय पदनताची उपेक्षा कशी करील? कान्ह्या भिल्लास काय वाटलें कुणास ठाऊक! रोखलेली बंदूक मागें घेऊन तो तसाच परत फिरला. मंदिराच्या बाहेर आल्यावर त्यानें पाटलांना बजावलें, "या बुवास गांवांतून जाऊं देऊं नका. मी पुन्हां एकदां शोध काढून येतों." कान्ह्या गेल्यावर मंदिरांत जाऊन लोकांनीं बुवास सावध करून गाभाऱ्याबाहेर आणलें.

श्री दासगणूंनीं यानंतर वरिष्ठांस गुप्तपणें पत्र लिहून कळवलें कीं 'माझ्या विषयीं लोकांस संशय आला आहे. तरी युक्तीनें त्याचें निराकरण करावें.' त्या प्रमाणें लवकरच एक दिवस श्री. मारुती पंढरीनाथ या नांवाचें एक पोलिस इंस्पेक्टर लोणीस आले आणि इकडे तिकडे तपास करून स्वारी मंदिरांत आली. बुवांच्या सच्चेपणाविषयीं संशय दाखवून फरारी माणसाची तपासणी करतात, तशी बुवांची अंगझडती घेऊन ते पाटलास म्हणाले, 'हा कान्ह्याचा

हस्तक असावा! पांडववाडीकडे आम्ही याचा तपास करतो. तोंपर्यंत यास हलूं देऊं नका.' या प्रकारानें उरल्यासुरल्या लोकांच्याहि मनांतील संशय पार नाहींसा झाला.

एकदां लोणीपासून जवळच गंगाराम पाटलाचें गुन्हाळ लागावयाचें होतें. त्यांनीं हात जोडून रामदासीबुवांना विनंति केली. 'महाराज, आपण आलें पाहिजे. नाईकहि येणार आहेत.' बुवांनीं उत्तर दिलें, 'मला ब्राह्मणाला कशाला बोलावतां? नाईकाला (कान्ह्या भिल्लाला) जेवणावळ म्हणजे वेडेवांकडें शिजणार! अशा ठिकाणीं मीं येणें बरें नाहीं. परत येतांना एकादा ऊंस आणा म्हणजे झालं."

कर्तव्याला अनुसरून दासगणूंनीं 'कान्ह्या भिल्ल अमुक ठिकाणीं अमुक वाजतां येणार आहे. तरी योग्य ती व्यवस्था व्हावी.' असें वर कळवलें. त्याप्रमाणें पन्नास पोलिसांनीं जन्याच्या वाडीस गराडा दिला. गोळीबार सुरू झाला. कान्ह्याला पकडण्यास पोलीस आले आहेत असें कळतांच पाटलाची तिरपीट उडाली ते तसेच धांवत मंदिरांत आले. आणि बुवांस म्हणाले, 'महाराज, नाईकाला शिपायांनीं घेरलें आहे. नाईक यांतून सुटावें म्हणून रामाची प्रार्थना करा. आपल्या आशिर्वादाशिवाय नाईकांना यश येणार नाहीं.'

इकडे पोलिसांनीं घेरलें तरी कान्ह्या डगमगला नाहीं. तो हाडाचा शूर होता. तो एका टेकडीवर चढून गेला. उभयपक्षीं गोळ्या झडूं लागल्या. शेवटीं त्यानें त्या टेकडीवरील गवत पेटवलें आणि त्या धुराच्या लोटांतून मोठ्या छातीनें पोलिसांचा वेढा फोडून तो निघून गेला. या झटापटींत कान्ह्याचें कोणींच दगावलें नाहीं. चार पोलीस मात्र ठार झाले. कान्ह्या सुखरूप निसटला तो रामदासी बुवांच्या कृपेनेंच, अशी भाबड्या पाटलाची ठाम कल्पना झाली.

पुढें कांहीं दिवसांनीं लोणीस आला असतांना कान्ह्या पाटलास म्हणाला, 'पाटील, हा रामदासी पोलीसच आहे रे!' पाटलास आतां बरा बळ आलें होतें. ते म्हणाले, 'वेड लागलंय् कीं काय तुला, नाईक? त्यांच्या आशिर्वादानें त्या दिवशीं तूं जिवानिशीं सुटलास पोलिसांच्या हातून! तूं त्यांना पोलीस म्हण. पण त्यादिवशीं त्यांना तुझा साथीदार म्हणून एका पोलीस इन्स्पेक्टरनें किती छळलें! त्यांना शिव्या काय दिल्या, अंगझडती काय घेतली! मी मध्यें पडलों म्हणून मारहाण तरी झाली नाहीं. बापडा सात्विक ब्राह्मण! देवदेव करीत राहिला आहे. त्यांच्या पाठीस कां लागतोस उगीच?"

कान्ह्या भिल्लाचें समाधान झालें असें दिसलें. तो पाटलासह दर्शनाकरितां म्हणून मंदिरांत आला. पायां पडत असतांना बुवांच्या पायांवरील वहाणांचे घट्टे पाहून कान्ह्याचा संशय पुन्हा बळावला. रामदासी बुवांकडे निरखून पाहात तो म्हणाला, "बुवा, तुमच्या पायांवर तर पोलिसी वहाणांचे घट्टे दिसताहेत!" बुवा मनांत चरकलेच. पण प्रसंगावधान राखून त्यांनीं उत्तर दिलें, "आमच्या कोंकणांत आम्ही वहाणाच घालतों बाबा!" हें उत्तर कान्ह्याला योग्य वाटलें, त्यानें लपून नमस्कार केला आणि गळ्यांतील सोळा

तोळ्यांचा सोन्याचा सात पदरी गोफ श्रीदासगणूंच्या पायावर ठेवून तो म्हणाला, 'महाराज, कोणत्या इन्स्पेक्टरनें तुम्हांला शिव्या दिल्या, सांगा! पंधरा दिवसांतच त्याचा मुडदा न पाडीन तर भिल्लाच्या पोटचा म्हणवणार नाहीं!'

यावर दासगणू म्हणाले, 'हें बघ माझ्याकरतां कोणाला मारूं नकोस! त्याला संशय आला, म्हणून त्यानें तसें केलें. मागें तूं नव्हती का बंदूक रोखलीस! आपल्या कपाळीं असतील ते भोग भोगलेच पाहिजेत. तुझा हा गोफही मला नको. मला याचा काय उपयोग? तूं आपला हा परत ने.' पण कान्ह्या तो परत घेईना. तेव्हां श्रीदासगणूंनीं तो तेथेंच पाटलाच्या स्वाधीन करून 'यांतले तीन पदर बाळंभटास द्या आणि बाकीचे मोडून मोडकळीस आलेल्या या मंदिराची डागडुजी करा!' असें शपथ घालून सांगितलें. पाटील व कान्ह्या दोघेही थक्क झाले. ही निरिच्छ वृत्ति उसनी वा वरपांगी नव्हती. तीं त्यांच्या हृदयाची सहजवृत्ति होती. पैसा न खाणें, हा जेथें केवळ अपवाद आहे, त्या पोलिस खात्यांत नोकरीस राहूनही अशा द्रव्याची इच्छाहि दासगणूंनीं कधीं केली नाहीं.

कान्ह्या भिल्लाला पकडणें कठीण आहे, असें अनुभवास आल्यावर सरकारच्या मनात एक निराळाच विचार आला. कान्ह्या भिल्ल हा श्री दासगणूंच्या समोर बराच वेळ येतो, असें पाहून वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून दासगणूला आज्ञा झाली कीं, 'तुम्हांस एक सहाबारी पिस्तुल देण्यांत आलें आहे. त्यानें कान्ह्यास जायबंदी करून पकडावें. त्यांत त्याच्या जिवाला धोका झाला तरी अडचण नाहीं. माणिक दौंडीच्या ठाण्यावर शक्य तितक्या लवकर येऊन सामान स्वाधीन करवून घ्यावें. त्याप्रमाणें श्रीदासगणू कांहींतरी निमित्त काढून मोठ्या युक्तीनें लोणीच्या बाहेर पडून माणिक दौंडीस आले. तेथें त्यांना सहाबारी पिस्तुल, काडतुसें, सहामाहीचा पगार भत्ता, उत्तम बातम्या पुरवल्याबद्दल पारितोषिक आणि कान्ह्या भिल्ल सांपडतांच एकदम दोन जागा वर बढतीचें आश्वासन असें सर्व मिळालें.

हें सर्व घेऊन दासगणू मिरजगांवांत आले. तेथील सरकारी दवाखान्यावर त्यांचे एक जिवलग स्नेही (श्री. अण्णाजी पांडुरंग नाशीकर कुळकर्णी) डॉक्टर होते. श्रीदासगणूंनीं मनाशीं विचार केला, 'मी ब्राह्मण. कोणाच्या रक्तानें आपले हात रंगवणें, हें चांगलें नाहीं. त्यांतून निशाण मारतांना माझी गोळी एकदांही टारजेटास लागली नाहीं. फुकटचा पगार खातो, नालायक आहे, अशी वरिष्ठांचीं बोलणीं मीं वरचेवर खालीं आहेत. अशा परिस्थितींत कान्ह्यावर झाडलेली गोळी त्याला लागेलच कशावरून? गोळी चुकतांच कान्ह्या आणि त्याचे साथीदार माझा जीव घेतल्यावांचून राहणार नाहींत. तेव्हां कसेंही करून आतां हा प्रसंग टाळलाच पाहिजे.' त्यांनीं ही सर्व परिस्थिति आपल्या डॉक्टर मित्रास सांगितली.

डॉक्टर म्हणाले, 'गणपतराव, कांहीं चिंता करूं नका. मी माझ्या अधिकारांत एक महिनाभर तुम्हांस रोगी म्हणून येथें ठेवूं शकतो. मात्र बाहेर फारसें हिंडूं नका आणि हजामत करूं नका.'

डॉक्टरांनीं दासगणूंचें नांव रोगी म्हणून नोंदवलें आणि 'गणेश दत्तात्रय हा आजारी झाल्यानें त्याला येथें ठेवून घेतलें आहे. त्यांच्याजवळील जोख-मीचें साहित्य, कागदपत्र व पोलिशी गणवेश ठाण्यावर परत पाठवीत आहे' असें वर कळवलें. वरिष्ठांकडून तांतडीनें उत्तर आलें कीं, 'गणेश दत्तात्रय हा आमचा फार महत्वाचा माणुस आहे. त्यास नगरच्या मोठ्या दवाखान्यांत नेण्यास आम्ही समक्ष येत आहोंत.' वरिष्ठ येण्याच्या सुमारास डॉक्टरनें दास-गणूंस कांहीं औषध दिलें. त्यामुळें त्यांना बराच ताप चढला. वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं दासगणूंना नगरास नेण्याचें निश्चित केलें. आतां मात्र या संकटांतून कसें पार पडावें, तें समजेना, पण परमेश्वर कृपेनें दासगणूंना पुन्हां या संकटांत पडावें लागलें नाहीं.

श्री. नानासाहेब चांदोरकरांच्या ओळखीचे श्री. बोस नांवाचे एक डॉक्टर नगरास नुकतेच बदलून आले होते. श्री. नानासाहेबांकडून येथें वशिला लागला. त्यानें 'या माणसाचें हृदय अशक्त झालें आहे. कोणत्याहि धोक्याच्या जागीं पाठविण्यास हा अयोग्य आहे' असा अधिकृत दाखला श्री दासगणूंना दिला. वरिष्ठ अधिकाऱ्यांचा निरुपाय झाला. आणि दासगणूंची नेमणूक पुन्हा जामखेडास झाली. अशा रितीनें श्रीदासगणूंच्या पुरतें तरी तें प्रकरण समाप्त झालें.

---

● दास्य दे हरि तुझ्या चरणांचें ।
कीर्तन श्रवण आचरणाचें ।
दे अनन्य हृदयीं स्मरणातें ।
हें न देशि, तरी दे मरणातें ॥

—वामन पंडित


ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स
३६३, मंगळदास मार्केट समोर, मुंबई नं. २.

ARSA PRODUCTS

❀ होजियरी ❀ तयार कपडे ❀ फर्निशिंग फॅब्रीक्स
व इतर सर्व तऱ्हेच्या कापडाचे व्यापारी
रिटेलर्स व होलसेलर्स टे. नं. २२८४४

# श्रीसाईबाबांची भूपाळी

[ चाल :—नमनें वाहुनि स्तवनें ]

जय जय सद्‌गुरु साईनाथा । भावें करि वंदन
भाविक, भावें करि वंदन ।
भारतभूषण, दीनदयाळा । अनंत गुणनंदन ॥ ध्रु० ॥
संतशिरोमणि लोकमंगला । जनता जगिं वदली
सदोदित, जनता जगिं वदली ।
काय माधुरी ठायिं तुझ्या ती । आकर्षक बनली ॥ १ ॥
परमानंदीं परब्रह्म तें जाणुनि योगेश्वर
मुनिवरा, जाणुनि योगेश्वर ।
दिव्य तपस्या सफल जाहली जन्मुनि देहीं नर ॥ २ ॥
विस्मयदायक चमत्कार ते । दाविसि जनसंकटीं
अनुभव, दाविसि जन संकटीं ।
जनक जननि ते धन्यपावली कुलदीपें कष्टी ॥ ३ ॥
तुझ्या दर्शना विविध देशिंचे । मेघासम धांवत
शिरडिस, मेघासम धांवत ।
गृहिणीसह सुतपरिवारें जन येती बा, हांसत ॥ ४ ॥
तुझें लेकरूं शरणागत हें । आळवि तें बाबा
तवपदा, आळवि तें बाबा ।
तात माउली वाली अमुचा। पाहा मज बाबा ॥ ५ ॥
पुण्य महात्मा पुण्यश्लोक तूं भुविं या अवतरला
प्रभुवर भुविं या अवतरला ।
जनिं दुःखांचा विविध ताप तो नाशाया सजला ॥ ६ ॥
शिरडी नव्हे तें वृंदावन कीं । पुण्यभूमि सजली
निरंतर, पुण्यभूमि सजली ।
कृष्णरूप साईस देखुनी आनंदें भरली ॥ ७ ॥
अनंत दुःखें भोगुनि । जन हें विषमय संसारीं
अशाश्वत, विषमय संसारीं ।
येउनि त्वत्पदिं शांति मिळविती । नामामृत सागरीं ॥ ८ ॥
शरणागतिचा भाग्यविधाता जन-मनिं साइ वसो
अखंडित, जनमनिं साइ वसो ।
धन्य धन्य ती पुण्यकृपा तव भक्ताभ्युदयिं असो ॥ ९ ॥

कवि—पंडित श्रीपाद के. टाकळकर शास्त्री

# सुश्लोकगीता

: अनुवादक :

वि. के. छत्रे

गीतानुवादें जरि या कुणाला
गीताशय स्वल्प कळून आला
संतोष झाला जरि अंतरास
होई मला नी जगदीश्वरास

× × ×

गीतार्थ चित्तीं दृढची ठसावा
ठसून तो आचरणींहि यावा
म्हणून झालों कविता-प्रवृत्त
कर्ता खरा श्रीहरि मी निमित्त

## अध्याय ६ वा

श्रीभगवान् म्हणाले—

### आर्या

१ धरितां न मनिं फलाशा, कर्तव्यें जो स्वकीय करी ।
तो संन्यासी योगी, त्यजि कर्म--अग्निहोत्र, तो न परी ॥
२ 'संन्यास' म्हणति ज्याला, पार्था तो 'योग' होय हें जाण ।
होईना कोणीही योगी, संकल्प टाकिल्यावीण ॥
३ साधन कर्म शमाचें मुनिच्या, जो योग सिद्ध करुं पाही ।
त्याचेंची शम साधन, झाल्यावर योग सिद्ध परि होई ॥
४ इंद्रिय-विषयीं कर्मीं वा राही जेधवां न आसक्ती ।
संकल्प सकल जाई, योग तदा सिद्ध जाहला म्हणती ॥

### उपजाति

५ बा ! आपणा आपण उद्धरावें, अधोगतीला न कदापि न्यावें ।
बंधु स्वतांचा नर की स्वतांच, शत्रु स्वतांचाहि तसाच साच ॥
६ स्वयेंचि घे जिंकुनि जो स्वतांला, तो आपला आपण बंधु झाला ।
तैसें करीना परि तो अजाण, वागे स्वतांशींच अरीसमान ॥

### आर्या

७ जिंकूनि आपणांला, अंतरिं जो शान्त, तो सुखीं दुःखीं ।
मानीं नी अवमानीं, शीतोष्णीं, स्थिर-समान राहे कीं ॥

८ ज्ञानें नी विज्ञानें तृप्त, जितेंद्रिय, नि गांठि जो मूळ ।
वा ! सिद्ध योग त्याचा, सम ज्या सोनें शिला नि ढेंकूळ ॥
९ मित्र, सुह्रद, मध्यस्थ, द्वेष्य, अरी बंधु नी उदासीन ।
दुष्ट नि सज्जन यांच्या, ठायीं समबुद्धि थोर त्या मान ॥
१० योग्यानें एकान्तीं नित्य रहावें, करीत अभ्यास ।
आंवरुनी चित्ता नी आत्म्यातें, त्यजुनि वासना-पाश ॥
११ आसन पवित्र जागीं, मांडावें प्रथम आपुलें अढळ ।
दर्भ—मृगाजिन-वस्त्रीं, उंच न जें, फार, फार वा सखल ॥
१२ एकाग्र मनें त्यावर साधाया, आत्मशुद्धि बैसूनी ।
योगाभ्यास करावा, चित्तेंद्रिय—हालचाल आंवरुनी ॥
१३ ताठ, स्थिर, शिर, मान नि पाठ सरल ठेवुनी, न हालविता ।
नाकीं लावुनि दृष्टी, इकडे तिकडे न सर्वथा बघतां ॥
१४ होऊनि शांत अंतरि पाळूनि ब्रह्मचर्य, युक्त असें ।
मच्चिंतनीं रमावें नीट मना आंवरूनि निर्भयसें ॥
१५ सन्तत योगाभ्यासें यापरि मन होऊनी स्व--वश अन्तीं ।
योग्यास मिळे माझ्या ठायींचीं मुक्तिची परा शान्ति ॥
१६ खाई बहु, खाईच न, झोंपाळू, झोंप वेचि ना कांहीं ।
हा योग सिद्ध त्याला, पार्था, होणार सर्वथा नाहीं ॥
१७ युक्त नि परिमित ज्याचे, आहार, विहार, कर्म, आचार ।
निद्रा, जागृति त्याला, योग सुखावह, न दुःख देणार ॥
१८ आत्म्यांतची स्थिरावे, मन जेव्हां आवरूनि धरलेलें ।
'युक्त' तदा त्या म्हणती, भोगेच्छा नांवची नसे उरलें ॥
१९ राहे निवांत जागीं, दीपाची जेंवि निश्चल ज्योति ।
अभ्यासू योग्याची आंवरलेली, तशी मनोवृत्ति ।
२० योगाभ्यासें जेथें, आंवरलेलें मन स्थिरावून ।
तेथें वसतें आपण, आत्म्यांतचि आपणांस पाहून ॥
२१ जें इंद्रिया कळेना, कळतें बुद्धीस तें सुख श्रेष्ठ ।
योगी भोगी जेथें स्थिर तो, होई न तत्त्वतां भ्रष्ट ॥
२२ जें मिळतां त्याहूनी अधिक वरा लाभ अन्य मानीना ।
सुस्थिर होतां जेथें, दारुण दुःखेंहि चलित होईना ॥

२३ नांवहि नुरतें जेथें, दुःखाचें, '**योग**' तो असो ठावें ।
त्या निश्चयें, प्रसन्नें चित्तें, कंटाळतां न साधावें ॥
२४ संकल्प--जन्य साऱ्या सोडूनी वासना विनाशेष ।
चोंहीकडुनि मनेचीं आंवरुनी इंद्रिया रहावेंस ॥
२५ आणी हळुं हळुं धैर्यें करित रहावें बरें प्रशांत मना ।
आत्म्यांताचि स्थिरावुन त्या, अन्यत्र भ्रमोंचि द्यावें ना ॥
२६ अस्थिर नी चंचल मन, पाहे निसटावया जिथें जेथें ।
रोधुनि, आत्म्याच्याची द्यावें ताब्यांत त्या तिथें तेथें ॥
२७ निष्पाप शांतचित्त, ब्रह्मीभूत नि रजोगुणातीत ।
योग्याचे पदि येतें उत्तम सुख त्या स्वयेंचि शोधीत ।
२८ यापरि योगाभ्यासीं संतत--रत पाप--मुक्त तो योगी ।
ब्रह्माचें संयोगें सुख जें अत्यंत, तें सुखें भोगी ॥
२९ सारीं भूतें अपुल्या ठायीं, आपणहि सर्व भूतांत ।
सर्वत्र सम दिसे त्या, जो झाला पूर्ण सिद्ध योगांत ॥
३० पाहे सर्वत्र मला, माझ्यांत दिसे तसें सकल ज्यातें ।
मी अंतरे न त्याला, अंतरतो तो न अर्जुना, मातें ॥
३१ सर्वांभूतीं जो मी, त्या, या एकत्व बुद्धिनें भजतो ।
व्यवहारिं वागुनीहि, योगी माझ्याच ठायिं, तो वसतो ॥
३२ जिकडे तिकडे भरला आपणची सारखा दिसे ज्यातें ।
दुःख असो सुख अथवा तो योगी श्रेष्ठ वाटतो मातें ॥

**अर्जुन म्हणाला—**

३३ तूं साम्यबुद्धिनें जो, साध्य असा योग हा मला कथिला ।
चंचल हें मन म्हणुनी, तो न टिके वाटतें प्रभो, मजला ॥
३४ चंचल मन हें देवा, दुर्जय, बलशक्ति दांडगें मोठें ।
वाऱ्यासम आंवरणें, त्याला मज कठिण फार कीं वाटे ॥

**श्रीभगवान् म्हणाले—**

३५ चंचल नि दांडगें मन, निःसंशय हें जरी, महाबाहो ।
अभ्यासानें आणिक, वैराग्यें सहज तेंचि वळतें हो ॥
३६ माझ्यामतें कठिणची योग नरा, जिंकिलें न मन ज्यानें ।
जिंकील मना त्याला, साधाया शक्य तो उपायानें ॥

अर्जुन म्हणालाः—

३७ सश्रद्ध, परि अनावर, ज्याचें मन योग-साधनीं चळतें
मोक्षास आंचवे तो, देवा, गति त्यास कोणती मिळते ?

३८ दोहींकडुनी सुटला, मोहें जो ग्रस्त, मोक्षमार्गांत ।
फुटल्या ढगाप्रमाणें, मध्येंची, नष्ट नाहिं ना होत ? ॥

३९ निरसीं संशय माझा, हा निःशेष, प्रभो ! कृपा करुनी ।
तुज वांचुनी नसेची निरसाया या समर्थ बा ! कोणी ॥

श्रीभगवान् म्हणालेः—

४० या लोकीं परलोकीं बा, तो पावेचि नाश ना पार्था ।
'दुर्गति' शिव-कर कर्मे करि-त्याला, हें नकोचि कीं वार्ता ॥

४१ पावे योगभ्रष्ट स्वर्गादिक-पुण्यकर्मि-लोकांतें ।
राहुनि सुचिर शुचि श्री-मंताचे गेहिं येइ जन्मातें ॥

४२ जन्म सुबुद्धांच्या तो योग्याच्याची कुलांत वा, पावे ।
यापरि जन्म सुदुर्लभ या लोकीं काय त्यास वानावें ? ॥

४३ त्या प्राप्त होति तेथें पूर्वीचे सर्व बुद्धि-संस्कार ।
योग अधिक साधाया मग तो, हे पांडवा, झटे फार ।

४४ पूर्वाभ्यासें तेणें सिद्धिकडे ओढिला बळें जाई ।
जिज्ञासुहि योगाचा शब्द-ब्रह्मापलीकडे जाई ॥

४५ झटतां झटतां योगी पापापासून पावुनी मुक्ति ।
होऊनि सिद्ध लाभे परमोच्च गती अनेक जन्मांतीं ॥

४६ श्रेष्ठ तपस्व्याहूनी श्रेष्ठ ज्ञान्याहुनीहि कीं योगी ।
कर्मठ पुरुषाहुनिही, पार्था, बा ! तूं म्हणून हो योगी ॥

४७ साऱ्या योग्यांतहि जो राहूनि मनें अखंड माझ्यांत ।
श्रद्धा-युक्त भजे मज, मानी मी श्रेष्ठ त्यास सर्वांत ॥

## अध्याय ७ वा।

श्रीभगवान् म्हणाले—

### (फटका)

१ धरुनि आसरा माझा, लावुनि मन मजठायीं निःशंक ।
जेणें जाणसि पूर्ण मला तूं योगें, पार्था तें ऐक ॥

२ ज्ञान तुला तें विज्ञानासह अशेष कथितों मी आतां ।
जाणायाचें शेष नुरेची, कळुनि एकदां जें येतां ॥

३ हजारांतुनी एखादाची मिळवाया तें नर झटतो ।
झटणाऱ्यांतुनिही एखादा यथार्थ मातें ओळखतो ॥
४ अहंकार, मन, बुद्धि, भूमि, जल, अग्नि, वायु, नभ यांमाजी ।
विभागलेली आठ प्रकारें राहे प्रकृति ही माझी ॥

(अनुष्टुभ्)

५ ही तों गौण, हिच्याहूनी श्रेष्ठ प्रकृति जाण ती ।
जीवभूत जिच्यायोगें जगाची या असे स्थिति ॥
६ या दोहीं पासुनी सारीं भूतें ध्यानांत हें धरीं ।
मूळ मी सर्व विश्वाचें, त्याचा अंतहि मी करीं ॥
७ माझ्या पलीकडे नाहीं कांहींही, पांडवा, बरें ।
माझ्यांत ओंवलें सारें, सूत्रांत मणि तेंवि रे ॥
८ रस तोयीं नभीं शब्द, प्रभा मी शशि–भास्करीं ।
ॐकार सर्वही वेदीं, पराक्रमहि मी नरीं ॥
९ सुगंध क्षितिमाजीं मी, अर्जुना, तेज पावकीं ।
तापसीं तप मी, सर्वां–भूतीं मी जीवशक्ति कीं ॥
१० बीज मी सर्व भूतांचें, जाण, पार्था, सनातन
बुद्धि मी बुद्धिमंतांची, तेजस्वी त्यांत तो गुण ॥
११ बल मी विषयासक्ति–वासना–स्पर्श ज्या नसे ।
नुल्लंघी धर्म–मर्यादा, भूतीं तो काम मी असें ॥
१२ तामसी राजसी आणी, सत्त्वयुक्त पदार्थ ते ।
माझ्या पासूनची; मी ना त्यांत, माझ्यांत जाण ते ॥
१३ त्रिगुणात्मक भावांनीं या साऱ्या मोहिलें जगा ।
यांच्याहि पार जो मी त्या, अक्षया जाणतें न गा ॥
१४ गुणात्मक अशी माझी दिव्य माया सुदुस्तर ।
मातेंचि शरण जे येती, तींत ते तरती नर ॥
१५ आसुरी बुद्धि ज्या ग्रासी, पापी अधम मूढ ते ।
माया ज्ञान हरी त्यांचें, शरण मातें न येति ते ॥
१६ भजती चार जातीचे सुज्ञ भावें जगीं मला ।
दुःखी, जिज्ञासु नी कामी, ज्ञानी तो चवथा भला ॥

(उपजाति)

१७ निष्काम कर्मांत सदा अनन्य, ज्ञानी असा त्यांत विशेष धन्य
अत्यंत वाटे प्रिय मी तयातें होई बहू तो प्रिय नेंवि मानें

(अनुष्टुभ्)

१८ चांगलेच जरी सारे हे, ज्ञानी 'मीच' मानितों ।
सर्वोत्तम गती जो मी, स्थिरावे त्यांत युक्त तो ॥
१९ वासुदेवचि मी सारें, ऐशा अनुभवें मला ।
पावे अनेक जन्मांतीं ज्ञानी, दुर्मिळ हा भला ॥
२० कामें वेडावले त्या त्या स्वभावा वश होऊनी ।
भजती अन्य देवा ते, ते ते नियम पाळुनी ॥
२१ श्रद्धेनें भक्त जो इच्छी, ज्या देवातें भजावया ।
करीं सुस्थिर मी त्याची, त्याची श्रद्धा, धनंजया ॥
२२ श्रद्धेनें युक्त त्या देवा तो आराधीतसे यदा ।
मीच निर्माण केलेले भोग त्या लाभती तदा ॥
२३ अल्प बुद्धि जनांचें त्या फल तों नष्ट शेवटीं ।
देवभक्त जसे देवा, मद्भक्त मज पावती ॥
२४ सर्व श्रेष्ठ असें माझें रूप अव्यय नेणते ।
मानिती व्यक्त अव्यक्ता मातें, जे मूढ लोक ते ।
२५ झांकला योग मायेनें सर्वांप्रति न मी दिसें ।
अज्ञानी लोक हा नेणें, 'जन्म—व्यय मला नसे' ॥
२६ आजपर्यंत जी झालीं भूतें, जीं आज अर्जुना ।
होणारीं हीं मला ठावीं, कळलीं न परी कुणा ॥
२७ इच्छा द्वेषांतुनी द्वंद्वें सुखदुःखादि जन्मती ।
जन्मतां सगळीं भूतें, त्या मोहें भ्रम पावती ॥
२८ परि ज्या पुण्यवंतांचा पाप--संचय संपला ।
द्वंद्व--मोह न त्या बाधे भजती दृढ ते मला ॥
२९ जरा मृत्यु चुकाया जे झटती मम आश्रयें ।
सर्व अध्यात्म नी कर्म, ब्रह्मही त्यां कळूनि ये ॥

(उपजाति)

३० मी सर्व भूतांत नि देवतांत, यज्ञांतही हें पटलें मनांत ।
त्यां मत्स्वरूप--स्मृति नीट राही, कृतान्त अंत्य--क्षणिं ओढितांही ॥

# — दे चरणीं थारा

जय जय साईबाबा । आरति तव चरणा ।
दीनोद्धारक जगिं हा । शिरडीचा राणा ॥
फकीर बाबा कोणी । अवलीया वदती ।
योगी सिद्ध म्हणुनियां । महिमा तव गाती ॥
परि तूं अक्षय अव्यय । चिन्मय चिच्छक्ती ।
साक्षात् दत्त दयाघन । मंगलमय मूर्ती ॥
जय जय साईबाबा आरति० ॥ १ ॥

उंच विभूती सुंदर । मस्तकिं तो फडका
अंगीं कफनी हातीं । सज्ज असे सटका ।
भव्य शिलासन पावन । तप्तांगार धुनी ।
तेजः पुंज विराजे । कांती तव वदनीं ॥
जय जय साईबाबा आरति० ॥ २ ॥

तेलाविण पाण्यानें । पणत्या पाजळिल्या ।
दिव्य उदीनें दुर्धर । व्याधी घालविल्या ।
शरणागत भक्तांच्या । विपदा लोपविल्या ।
अगम्य ऐशा लीला । जगता दाखविल्या ॥
जय जय साईबाबा आरति० ॥ ३ ॥

अनन्यभावें अगणित । शिरडिस जे येती ।
समाधि वंदन करुनी । दर्शन तव घेती ।
त्यांचें दुःख निवारुनि । भाग्य तयां देसी ।
कीर्तीचा हा डंका । दुमदुमतो जगतीं ॥
जय जय साईबाबा आरति० ॥ ४ ॥

ध्यानीं वदनीं 'साई', अखंड जे जपती ।
साक्षात्कार घडे त्यां । ऐशी तव महती ।
गोदातीर विहारा । वेदश्रुति-सारा ।
वैष्णव आरति करतो । दे चरणीं थारा ॥
जय जय साईबाबा आरति० ॥ ५ ॥

—विष्णु हरि इनामदार

# श्रीज्ञानेश्वर–जीवन

कै. वाङ्मयप्रभु खं. स. त्रिलोकेकर

कै. वाङ्मयप्रभु खं. स. त्रिलोकेकर यांचा ज्ञानेश्वरीचा प्रगाढ व्यासंग होता. श्री ज्ञानेश्वरांचें जीवनचरित्र आणि तत्त्वज्ञान यांवर एक ग्रंथ लिहिण्यास त्यांनीं अलीकडेच सुरवात केली होती. त्यांच्या अकाल्पित निधनामुळें हा ग्रंथ अपुराच राहून गेला. पण जीं कांहीं थोडीं प्रकरणें त्यांनीं पुरीं केलीं होतीं तीं श्री साईलीलेमधून क्रमशः देण्याचा आमचा संकल्प आहे. त्याप्रमाणें दोन प्रकरणें आज देत आहोंत—

## प्रकरण १ लें

आपेगांवचे गोविंदपंत कुलकर्णी व त्यांची पत्नी निराई ही ज्ञानेश्वरांची आजा आजी होत. हीं दोघेंही आपेगावांत अत्यंत धर्मशील व सात्विक म्हणून प्रसिद्ध होतीं. आपेगांव हें पैठणहून चार कोस गोदावरीच्या उत्तरतीरावर असल्यामुळें तेथील निसर्गदेवतेचें सौंदर्य पैठणच्या तुलनेने अंतःकरणाला प्रशांत व प्रसन्न करणारें असें होतें. अखंड भगवंताच्या उपासनेमुळें त्यांना एक पुत्र झाला. त्यावेळी महाराष्ट्रांत मुलामुलींना देवादिकांची किंवा पवित्र नद्यांची नांवें देण्याची प्रथा होती. त्याप्रमाणें गोविंदपंतांनीं आपल्या मुलाचें नांव विठ्ठल असें ठेवलें. ह्या विठ्ठलाचें रूप देखणें होतें. त्याच्या डोळ्यांतून त्यांच्या अंगी असलेलें वैराग्य जणू हळूच बाहेर डोकावीत होते. त्यांचा व्रतबंध झाल्यानंतर यात्काळाच्या ब्राह्मण समाजांतल्या इतर मुलांप्रमाणें धर्मग्रंथांचे अध्ययन करून तो चांगला वेदविद् झाला. तारुण्यांत ज्यावेळीं सर्वसुखांचा उपभोग घ्यावयाचा अशा वयांत त्याला तीर्थयात्रा करण्याचा नाद लागला. संसार मिथ्या आहे, ब्रह्म सत्य आहे, अशा विचारांचा पगडा त्यावेळीं समाजावर जास्त होता. प्रत्यक्ष समोर असलेल्या संसारापेक्षां मोक्षसाधनाचीच तळमळ विठ्ठलाच्या मनांत जास्त वाढूं लागली, ह्या विचारांच्या लाटेच्या जोरांत त्यानें घर सोडलें व तो तीर्थयात्रेस निघाला. त्यावेळची सर्व प्रसिद्ध तीर्थक्षेत्रें पाहून विठ्ठलपंत पुण्याजवळ आळंदी ह्या क्षेत्री पोंहोचला. आळंदी हें क्षेत्र ज्ञानेश्वरांच्या जन्मापूर्वीही एक सुप्रसिद्ध क्षेत्र म्हणून प्रसिद्ध असले पाहिजे. नाहींतर केवळ तीर्थयात्रा करण्याच्या उद्देशानेच निघालेल्या विठ्ठलपंतांनी आळंदीस भेट देण्याचें दुसरें कांहींच प्रयोजन नव्हतें. इंद्रायणींत स्नान करून बाहेर आल्यावर तोंडानें स्तोत्र म्हणत ते तेथील वाता-

वरणांत प्रसन्न झाले. योगायोग असा कीं नेमक्या ह्याच वेळी आळंदी येथील सिधोपंत नांवाच्या यजुर्वेदी ब्राह्मणाची स्वारी तेथून आपल्या घराकडे चालली होती. सिंधोपंतानीं विठ्ठलपंतास पाहिल्याबरोबर त्यांची वैराग्यशील तेजस्वीमूर्ती व त्यांचे तारुण्य हीं सिंधोपंताच्या चटकन् डोळ्यांत भरली. सिंधोपंतानी त्यांचे नांव—गांव विचारून त्यांच्यासंबंधी सर्व माहिती काढली. विठ्ठलपंतांचा गोड स्वभाव विनम्रवृत्ति आलि शालीनता पाहून सिंधोपंत अत्यंत खूष झाले. 'झाली ज्याची उपवर दुहिता चैन नसे त्या तापवि चिंता ' ह्या न्यायानें त्यांना आपल्या मुलीच्या लग्नाची चिंता किती काळ व्यग्र करीत होतीच, अशा परिस्थितींत विठ्ठल पंताळा पाहताच 'हा जर आपणाला जांवई मिळेल तर काय बहार होईल!' ह्या आशेनें त्यांच्या तोंडास पाणी सुटलें. सिधोपंत अत्यंत खटपटी व एकाद्याचें मन वळविण्याच्या कामांत तरबेज होते. सिधोपंत मनानें जेवढे निश्चयी तेवढे विठ्ठलपंत मनाचे ढिले. द्विधा बुद्धी, अनिश्चयी स्वभाव, जगाच्या अनुभवाच्या नांवानें शून्य, ही विठ्ठलपंताच्या स्वभावांतील प्रमुख व्यंगें होती. एऱ्हवी विठ्ठलपंत स्वभावानें इतका मवाळ कीं एकाद्या मुंगीचा प्राण वांचविण्यासाठीं सुद्धा आपला स्वताचा प्राण देईल पण अस्थिरता, अनिश्चय आणि द्विधा वृत्ती ह्या दोषामुळें त्यांच्या भावि आयुष्यांत त्यांच्या हातून नकळत असे भयंकर प्रमाद घडले; विवाहित पत्नीला टाकून संन्यास घेणें, संन्यास घेताना श्रीपादयती पासून वस्तुस्थिती, ते संन्यास देणार नाहींत ह्या भीतीनें, दडवून ठेवणें आणि लोकापवादाला भिऊन केवळ आपल्या मुलांच्या कल्याणासाठींच (आपण ब्रम्हवृंदाची आज्ञा पाळली तर आपल्या मुलांना तरी हे ब्राम्हण. द्विजत्वाचे अधिकार देतील ह्या आशेनें) ब्रह्मवृंदाची 'देहांत प्रायश्चित्त' ही आज्ञा मान्य करून आपल्या तरूण पत्नीसह प्रयागांत त्रिवेणींत उडी मारून आत्महत्या करणें, ह्या सर्व गोष्टींस त्यांचें हृदयाचें ढिलेपण कारणीभूत होतें. असो. इकडे भवितव्यता सिधोपंत त्यांची कन्या रखुमाई आणि विठ्ठलपंत ह्यांचे पूर्वऋणानुबंधाचे लागेबांधे जोडण्यांत सज्ज झाली होती. त्या भवितव्यतेपुढें बिचारी रखुमाबाई, विठ्ठलपंत आणि सिधोपंत ह्यांचा काय पाड! निश्चयी सिधोपंत आणि अनिश्चयी विठ्ठलपंत ह्या दोघांच्या विचार विनिमयांत सिधोपंतांची सरशी होऊन विठ्ठलपंतांचे आळंदीसच रखुमाई बरोबर लग्न लागलें! ह्याला म्हणतात नियती! वास्तविक दुसरा एकदा मनुष्य विठ्ठलपंताच्या जागी असता तर त्यानें आपेगांवी असलेल्या आपल्या मातापितरांची संमती घेऊन त्यांना आळंदीस आणून त्यांच्या आशीर्वादाच्या छत्राखालींच हें लग्न उरकून घेतलें असतें. पण विठ्ठलपंत हा अगदीं देवमाणूस! बिचाऱ्या सिधोपंतानें व त्यांच्या मुलीनें आपलें इतकें गोड आदरातिथ्य केलें, आपली मनोभावें सेवा केली त्यांचा शब्द मोडणें म्हणजे माणुसकीचें लक्षण नव्हे. मातापितरे आपलीच आहेत त्यांची आपण कशी ही समजूत घालू अशा अंतकरणाच्या मवाळ स्थितींत त्यांनीं आपले लग्न लावलें. त्यांच्या निरूपद्रवी व गोड स्वभावाला कर्तव्या-

कर्तव्याचा विचारसुद्धां सुचला नाहीं. त्यांत त्यांच्या अत्यंत भावनावश मनाला प्रत्यक्ष पांडुरंगच आपल्याला हें लग्न करण्यास आज्ञा करतो असा दृष्टांत झाला मग इतर विचारांची काय मातब्बरी. विठ्ठलपंत कांहीं काळ लग्न करून संसारांत स्वस्थपणें बसले पण त्यांचें मन कांहीं स्वस्थ बसले नव्हतें. त्यांच्या मनांत प्रवृत्ती व निवृत्ती हे जुनें द्वंद्व कायम होतें. आपल्या सासऱ्याच्या संमतीनें ते दक्षिण हिंदुस्थानांत रामेश्वरपर्यंत यात्रा करून परत आले. तेथून सिंधोपंत व रखुमाई ह्यांच्यासह विठ्ठलपंत आपेगांवीं आपल्या मातापितरांच्या भेटीस गेले.

\+ + +

## प्रकरण २ रें

आपेगांवी विठ्ठलपंत रखुमाई व सिधोपंत हे आलेले पाहून गोविंदपंत आणि निराई ह्यांचा आनंद गगनांत मावेनासा झाला. त्यांतल्या त्यांत सिधोपंत सारख्या श्रीमंताची रखुमाई सारखी लावण्यवती व कुलवती मुलगी आपल्याला सून लाभलेली पाहून तर त्यांना अत्यंत धन्यता वाटली. त्यांत सिंधोपंतानी आणलेला उंची अहेर पाहून तर त्यांच्या हर्षास सीमाच राहिली नाहीं. ही सर्व परमेश्वराची कृपा असें समजून त्यांनीं परमेश्वराची अत्यंत भक्तिभावानें प्रार्थना केली. सिंधोपंताची स्वारी कांहीं दिवसांनीं आपेगांवी परत गेली. आपल्या जामातांचा लहरी स्वभाव त्यांना माहिती होताच. त्यानी कांहीं कमी जास्त झाल्यास ताबडतोब बातमी कळीव असा इषारा जाता जाता आपल्या लाडक्या मुलीस दिला.

विठ्ठलपंत नवीन नवीन संसारांत नीट वागले. जो पर्यंत त्यांचीं मातापितरें जिवंत होती तोपर्यंत मात्र त्यांनी पुन्हा तीर्थयात्रेला जाण्याची गोष्ट काढली नाहीं. दोन तीन वर्षांच्या अवधींत विठ्ठलपंतांचीं मातापितरें वारलीं. आईबाप वारल्यानंतर विठ्ठलपंतांचें मन पुन्हा संसारांतून उडून गेलें. तेवढ्या अवधींत जर त्यांना एकादें मूल झालें असतें तर त्या मुलाच्या लडिवाळपणाच्या मोहांत अडकून संसारांत ते स्थिर राहिले असते. पण तेंही भाग्य आपल्या वाटेस नाहीं असें पाहून त्याचें मन पुन्हा अस्थिर झालें, रखुमाबाईनें ह्या संकटांतून वांचविण्यासाठी देवाचा धांवा तर केलाच पण त्याच वेळी आपल्या वडिलाना सुद्धा ही बातमी कळविण्याची व्यवस्था केली. सिधोपंताना ह्यांत कांहीं नवें नव्हतें. आपल्या जांवईबापूंचा स्वभाव त्यांना पूर्णपणें ठाऊक होता. त्यांनी विठ्ठलपंताना आळंदीस कायमचें राहण्याचा आग्रह केला, अनिश्चित मनाच्या विठ्ठलपंतानें ती गोष्ट मान्य करून ते आळंदीस सिधोपंताच्या घरीं येऊन राहिले. रखुमाबाई अत्यंत साध्वी स्त्री होती. तिनें परोपरीनें आपल्या पतीस आपली मर्यादा न ओलांडता मधून मधून दोन गोष्टी सांगाव्या. लग्न होऊन इतकी वर्षे झाली तरी आपणाला संतती नाहीं, हें शल्य तिच्या कोमल हृदयास अहोरात्र टोंचूं लागलें. निपुत्रिकाचें तोंड देखील पाहूं नये अशी त्याकाळीं तीव्र समजूत होती, आपल्या नवऱ्याच्या मनाला ही गोष्ट विशेष लागत असल्यामुळें त्याचे संसारांतून मन उडणें साहजिकच आहे, असें ही तिला वाटूं लागलें. त्या काळीं कोणी

निपुत्रिक असला कीं त्याचा सर्व दोष स्त्रीच्या माथीं ती वांझ म्हणून मारला जाई. हा विचार सुद्धां तिच्या मनांत आल्यावांचून राहिला नाहीं. अशा परिस्थितींत विठ्ठलपंतांनीं तिला पुन्हां एकदां आपण संन्यास घेणार अशी धमकी दिल्याबरोबर अत्यंत उद्विग्नतेनें ती नवऱ्याला कांहींतरी बोलली असेल. कारण तिची देवावर पूर्ण श्रद्धा होती. आपणाला परमेश्वर कृपेनें संतती झालीच पाहिजे अशी तिची श्रद्धा तिला सांगत होती. आपल्या उद्विग्न पत्नीच्या तोंडून निघालेल्या कमी अधिक शब्दाचा फायदा घेऊन विठ्ठलपंतानें घर सोडलें. त्यानें काशीस जाऊन श्रीपादयती (रामानंद) कडून संन्यासाची दीक्षा घेतली. ही बातमी आळंदीस येऊन पोंचली. समाजांत विघ्नसंतोषी लोक कांहीं कमी नसतात. अशाच लोकांनी ही बातमी तिखटमीठ लावून रखुमाईच्या कानावर घातली. ही बातमी आकाशाच्या कुन्हाडीप्रमाणें तिला वाटणें स्वाभाविक आहे. पण रखुमाबाई ही जितकी पतिनिष्ठ होती तितकीच ती ईश्वरनिष्ठही होती. "माळिये जेउतें नेलें! तेउतें निवांतचि गेलें। पाणिये ऐसें केलें। हो आवेगा ॥" ह्या ज्ञानेश्वरींतील सुभाषिताची ती प्रत्यक्ष चालती बोलती देवता होती. किंबहुना ह्या ओवींत त्यांच्या धर्मशील मातोश्रींच्या चारित्र्याचें सार होतें. सर्व भार परमेश्वरावर ठेऊन ती परमेश्वर भजनांत आपल्या आयुष्याचें दिवस कंठीत होती. जगांत आपल्याला आतां कोणीही नसलें तरी निदान परमेश्वर तरी आपला पाठीराखा आहे, ही श्रद्धा तिच्या वाढत्या भक्तीबरोबर कायम ठसली होती. 'माझीया भक्तां। आणि संसाराची चिंता। काय समर्थांची कांता। कोरान्न मागे ॥ असें आश्वासन तिच्या अतरांतला परमेश्वर तिला सारखा देत होता. तिच्या एकनिष्ठ भक्तीमुळें आपणावर येणाऱ्या सर्व संकटाबरोबर टक्कर देण्याची शक्ती याच्यांत जागृत झाली होती. अशा परिस्थितींत एके दिवशीं ती दारांतून उगवत्या सूर्याला नमस्कार करीत आहे इतक्यांत एक तेजस्वी संन्याशाची स्वारी तिच्यापुढें उभी राहिली त्या यतीला पाहतांच त्या माऊलीनें साष्टांग वंदन केलें. 'पुत्रवती भव' असा आशीर्वाद त्या यतीनें अत्यंत गंभीर स्वरांत दिला. हे शब्द कानीं पडताच, ती एकदम चमकली. विषण्णता, खिन्न हास्य व नैराश्य ह्या विकारांच्या छाया तिच्या चेहऱ्यावर सुस्पष्ट उमटल्या. ती कांहीं बोलण्याचा प्रयत्न करणार पण ओंठावाटे शब्द बाहेर पडेना. ही तिची स्थिति पाहून श्रीपादयतीसुद्धा एकदम थबकले— 'बाई माझ्या आशीर्वादानें तूं अशी गांगरून कां गेलीस' असा प्रश्न श्रीपादयतीनें मोठ्या प्रेमळपणें तिला केला. तिनें सर्व इत्थंभूत हकीकत त्यांना कळविली, आपल्याला खोटें सांगून संन्यासाची दीक्षा घेणारा विठ्ठलपंत हाच ह्या बाईचा नवरा असला पाहिजे ह्याबद्दल त्यांची खात्री झाली. ही गोष्ट शास्त्र संमत नसून त्यामुळें ह्या बाईला झालेला अन्याय दूर करणें हेंच शास्त्र संमत आहे हें त्याना समजले. त्यांनी लगेच काशीस परत जाऊन विठ्ठलपंताची चांगली खरडपट्टी काढून त्यांना परत आळंदीस स्वगृहीं जाऊन संसार करण्याची आज्ञा केली.

विठ्ठलपंत आळंदीस गुरूच्या आज्ञेवरून येऊन राहिल्याबरोबर ब्राम्हण मंडळींत मोठीच खळबळ उडाली ' यतीचा पुन्हा पती झाला ! शिव शिव ' "अब्रह्मण्यम्" हे शब्द प्रत्येक ब्राह्मणाच्या तोंडून निघूं लागले. विठ्ठलपंत हे आळंदीतील समस्त ब्रह्मवृंदाच्या टीकेचे, धिक्काराचे आणि निषेधाचे विषय होऊन बसले. ब्राह्मणांच्या सभा झाल्या, मोठे कडाक्याचे वाद झाले, अगदी तीव्र निषेधपर भाषणे झाली. त्या ब्राह्मण समाजांत कांहीं समंजस ब्राह्मण मंडळी होती, त्यांनीं प्रत्येक नियमाला अपवाद असतो हे सांगितलें. खोटे सांगून दीक्षा घेणाऱ्या विठ्ठलपंताना श्रीपादयतीनी पुन्हा संसारांत बसण्याची आज्ञा केली. ही सत्याला व धर्माला धरून अशीच गोष्ट आहे. असा उपपक्ष मांडणारे कांहीं सज्जन ब्राह्मणही त्यांत होते. प्रत्येक समाजांत हा प्रकार असतोच पण त्या समंजस ब्राह्मणावर सुद्धां विठ्ठलपंताच्या वकिलीबद्दल वाळींत टाकण्याची धमकी मिळाली. तेव्हां सर्वांनीं त्या प्रक्षुब्ध ब्रह्मवृंदाच्या ठरावापुढें नमते घेतले. विठ्ठलपंत आणि रखुमाई ह्यांना वाळींत टाकलें. ब्राह्मणाच्या दृष्टीनें ते आतां पंचमा पेक्षांही नीच ठरले. येथून विठ्ठलपंत व रखुमाई ह्यांच्या छळास प्रारंभ झाला.

( पुढें चालू )

---

● जो अन्न देतो उदरासी । शरीर विकारें लागे त्यासी ॥
मग जेणें घातलें जन्मासी । त्यासी कैसें विसरावें ? ॥

—श्रीरामदास


॥ श्री साईनाथ प्रसन्न ॥

**बॉम्बे सिल्व्हर शॉप**

टेलिफोन ३८८६२

शुद्ध चांदीचा हरेक तऱ्हेचा माल बनविण्याचें व ऑर्डरप्रमाणें माल करून देण्याचें विश्वासलायक ठिकाण. त्याचप्रमाणें सोन्याचाही माल ऑर्डरप्रमाणें करून देण्यांत येतो. एकदां भेट देण्याची तसदी घेऊन खात्री करून घेण्याची विनंती आहे.

**बा. गो. जुवेकर**
मालक
गिरगांव, मांगलवाडी,
श्री धूतपापेश्वर प्रासाद, मुंबई नं. ४

॥ विमलेश्वर प्रसन्न ॥

**भा. रा. रेवणकर सराफ**

ठळकवाडी ( बेळगांव )

**सोन्या-चांदीच्या तयार दागिन्यांचे व्यापारी**

आमचेकडे खडे मोत्यांचे सेटिंग्जचे आधुनिक पद्धतीचे दागिने, लप्फे, तन्मणी, नेकलेस इअरींग्ज वगैरे तयार होत त.

बाहेरगांवच्या व्यापाऱ्यांचे ऑर्डरीकडे विशेष लक्ष दिलें जातें.




## मार्च १९५७

या महिन्यांत श्रीसाईदर्शनासाठीं बाहेर गांवचे भक्त नेहमीं प्रमाणें श्रींचे दर्शनास आले होते. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती पुढील प्रमाणेंः—

**कीर्तनः**—सौ. कमलाबाई गंगाधर कुंटे, अलीबाग, श्रीमती लक्ष्मीबाई पुरोहित, सातारा, श्री. ह. भ. प. मारुती शास्त्री हरगेवार, बासर ( नांदेड ); संस्थान गवई श्री. मराठे यानी श्री. तुकाराम बीज, एकनाथ षष्ठी व फा. शु. ११ फा. व॥ ११ अशी ४ कीर्तनें मंदिरात केली.

**प्रवचनः**—वे. शा. सं. अरविंद बुवा भट, चोपडा, श्री. सदाशिव गोपाळ तान्हे, लोणावळा, सौ. रुक्मिणीबाई आठवले, नगर.

**वेदघोष हजेरी** श्री. वे. मु. गणेश भटजी मुळे, नगर.

**बासरीवादन**ः—श्री. रामचंद्र शामराव बोरकर मुंबई

**सतारवादन**ः—श्री. विठ्ठल तुळशीराम इंगळे, गुलबर्गा. श्री. शंकर कृष्णाजी उपाध्ये, हैद्राबाद. श्री. सिद्धेश्वर तुकाराम उपाध्ये, हैद्राबाद.

**गायन**ः—श्री. जगन्नाथबुवा सुरतकर, साकोरी. श्री. सदाशिव देवताजी गुजर, मुंबई. श्री. एस्. बी. माने, मिरज. श्री. मनोहर कुलकर्णी, मिरज. श्री. केशरी नरगुहे, मिरज. श्री. रुस्तमजी गुस्तादजी हत्तीदास, नगर. श्री. राजाराम छत्रपती, नगर. श्री. पांडुरंग सशित्तल, मुंबई. श्री. बापूजी हरणे कुलाबा.

रंगपंचमीनिमित्त श्रींचे रथाची गांवांतून मिरवणुक निघाली होती. श्रीसाईसंस्थान धर्मार्थ दवाखान्यातून नेहमीप्रमाणें पुष्कळ लोक औषधोपचारार्थ आले.

## एप्रिल १९५७

बाहेर गांवचे भक्तांची गर्दी नेहमी प्रमाणें होती.

**कीर्तनः**—श्री. श्री. बा. देव व श्री. तुकारामबुवा आजगांवकर. सं. गवई मराठे यांनीं श्री. अक्कलकोट स्वामी पुण्यतिथी, श्रीभाऊ कुंभार पुण्यतिथी, चैत्र व. ११ अशी तीन कीर्तनें केलीं.

**प्रवचनः**—वे. शा. सं: श्रीपादशास्त्री टाकळकर, बेलापूर यांचे सात दिवस श्रीमद्‌भागवत सप्ताह प्रवचन झालें तसच श्री. जनार्दन परशुराम भारवे याचे प्रवचन झालें.

**कसरतीचे प्रयोगः**—श्री. बहिरू श्रीपती आवडे, कोरेगाव, शेख महंमद उमर, सातारा.

**नृत्यः**—कु. विजया राणे, मुंबई,

**गायनः**—श्री. ठाणेदार, राहता. श्री. सुरेश वसंत पंडित, माहीम. श्री. अरुण रामचंद्र कामत, सौ. शांता कुळकर्णी, कारेगाव कु. कुंदा वाघ, कारवार कु. रंजन वाघ, कारवार, श्री. कमला रायचूर, श्री. अर्जुन आत्माराम सातपुते, श्रीगोंदा, सौ. ललिता देशमुख, विजापूर श्री. सदाशिवराव बाबरस, बीड, श्री. सुधाकर राजाराम ध्रुव, मुंबई. सौ. वासंती बाई आनंदजी, मुंबई. कु. वसुंधरा श्रीखंडे, मुंबई. कुमार मनमोहन वासुदेव सामंत, मुंबई.

**सनई वादनः**—श्री. भिकाजी गुरव, बडोदा.

**तबला वादनः**—श्री बाळ कृष्ण नारायण पांगम, मुंबई व श्री गणपतराव जाधव सोलापूर, श्री. कृष्णा माने, सोलापूर

**संगीत हजेरीः**—दत्तोबा तांबे व भाऊ मांग, नारायण गांव.

**भजनी कीर्तनः**—श्री. कै. गाडगे बुवांची शिष्य संत जनाबाई आळंदीकर.

धर्मार्थ दवाखानाः—नेहमी प्रमाणें रोगी फायदा घेत आहेत,

## रामनवमी महोत्सव

श्री. सच्चिदानंद सद्‌गुरु साईबाबा महाराज मु. शिर्डी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर, येथील रामनवमी उत्सव शके १८७९ चैत्र शु॥ ९ दि. ८ एप्रिल १९५७, सोमवार रोजीं साजरा करण्यांत आला. उत्सवास मुंबई, पुणें, नासिक, हैद्राबाद, मद्रास वगैरे दूर दूरची गावांहून बरीच भक्त मंडळी नेहमीप्रमाणें आली होती.

उत्सवाचा प्रारंभ रविवार दि. ७–४–१९५७ रोजीं सकाळीं काकड आरतीपासून झाला. ह्या दिवशीं नेहमींच्या कार्यक्रमा व्यतिरिक्त, सामुदायिक अभिषेक, दोन प्रहरी ह. भ. प. पालये शास्त्री यांचें सुश्राव्य प्रवचन; ह. भ. प. अनंतराव आठवले ह्यांचें सायंकाळीं श्रवणीय कीर्तन; रात्रौ श्रीच्या पालखीची गावांतून मिरवणूक व तदनंतर कलाकारांची हजेरी हे कार्यक्रम झाल्यावर शेजारती होऊन ह्या दिवसाचा कार्यक्रम संपला.

सोमवार दि. ८ एप्रील रोजी रामजन्माचा दिवस असल्यामुळें उत्सवास पहाटे ४–३० वाजतां श्रींच्या कांकड आरतीस सुरवात झाली. सालाबादप्रमाणें कावडी मिरवणूक सकाळीं ६–३० वाजतां निघून श्रींच्या समाधीला कावडीतून आणलेल्या गंगेच्या पाण्यानें सुमारें ७–३० वाजतां स्नान घालण्यात आलें. व नंतर नेहमीप्रमाणें पूजा–अर्चना–नंतर सामुदायिक अभिषेकास प्रारंभ झाला. त्या नंतर ह. भ. प. दासगणू महाराजांचे प्रतिनिधी ह. भ. प. अनंतराव आठवले यांचे राम चरित्रावर कीर्तन झालें. संध्याकाळीं ह. भ. प. पालये शास्त्री यांचे प्रवचन झालें व काठीसहीत निशाण व रथ यांची मिरवणूक निघाली.

या दिवशी सबंध रात्र बाबांचे जागरण असल्यामुळें रात्रभर निरनिराळ्या कलाकारांनी श्रींच्या समोर हजेरी देऊन दुसऱ्या दिवशी पहाटे ६ वाजे पर्यंत समारंभ

साजरा केला. या समारंभांत नामवंत कलाकारांनी हजेरी दिली; व संस्थानचे श्री. रासने व श्री. देव या विश्वस्तांनीही भाग घेऊन कार्यक्रमाचा समारोप केला. ह्या अवधींत रात्रौ शोभेच्या दारूचें उत्तम प्रकारचे काम शिवाच्या ओट्या जवळ झालें.

मंगळवार दि. ९ रोजीं श्रींच्या स्नाना-नंतर पूजा अर्चा होऊन सामुदायिक अभिषेक झाला. ज्या ज्या कलाकारांनीं आणि भक्तांनीं कार्यक्रमांत भाग घेतला होता त्यांना श्रीफल–प्रसाद देण्यांत आला. श्री. पंडितराव नगरकर यांच्या भजना-नंतर ह. भ. प. अनंतराव आठवले यांनीं कीर्तन केलें आणि दही हंडी होऊन उत्सव समाप्त झाला.

उत्सवाकरतां असंख्य भक्तवृंद गोळा झाला असल्यामुळें संस्थानच्या नेहमींच्या इमारतीतील जागा पुरेशा होणार नसल्या-मुळें जादा ६० कापड–खोल्या बांधण्यांत आल्या होत्या.

गर्दी खूप असली तरी भोजन मंडप विस्तीर्ण बांधून, स्त्री पुरुषांकरता वेगवे-गळी व्यवस्था करून आणि रांगेनें भक्तांनीं यावें अशी शिस्त ठेवून सर्व कार्य व्यवस्थित पार पाडण्यांत आलें. भोजन-गृहाच्या व्यवस्थेच्या कामीं श्री. मालपेकर डॉ. दाभोळकर, श्री. रासने, श्री. म्हात्रे, श्री. रेळे, श्री. वर्तक यांनीं व स्वयंसेवकांनीं फार मेहनत घेतल्यामुळें भक्तांची सोय उत्तम झाली.

करमणुकीच्या कार्यक्रमांत श्रीमती हिराबाई बडोदेकर, श्रीमती सरस्वतीबाई राणे, श्री. पंडितराव नगरकर, श्रीमती सुलोचनाबाई नगरकर, श्रीमती मधुबाला जव्हेरी, श्रीमती विमलाबाई नारवेकर श्री. कृष्णराव नारवेकर, प्रो. लहानू नागपुरे, इत्यादि नामवंत कलाकारांनीं भाग घेतला होता. श्रींपुढें उत्कृष्ट कलावंतांनीं हजेरी द्यावी म्हणून प्रसिद्ध संगीत दिग्दर्शक श्री. दत्ता कोरगांवकर यांनीं जिव्हाळ्याने श्रम घेतले होते

स्वयंसेवक तसेंच पोलिस व होमगार्ड यांनीं उत्कृष्ट बंदोबस्त ठेवला होता. पोलिस अधिकारी श्री. स्कॉट हे स्वतः वारंवार फिरून दक्षतेनें देखरेख ठेवीत होते.

कोपरगांव ते शिर्डी बसची व्यवस्था एस्.टी. नें चांगली ठेवली होती. या वर्षी उत्सवाकरतां ६०ते ७० हजार यात्रा आली होती. यंदा श्री. ना. आ. सावंत यांच्या अध्यक्षतेखालीं उत्सव-समिति नेमली होती.

## मे १९५७

या महिन्यात श्रीसाईदर्शनास बाहेर-गांवचे भक्त मंडळींची बरीच गर्दी दर-रोज होत असे. कांहीं कलाकारानीं आपल्या कलेची हजेरी दिली ती खालीलप्रमाणें—

**कीर्तन**:—श्री. ह. भ. प. केशव पुरुषोत्तम भालेराव, वडनेर

**नकला**:—श्री किसन रामचंद्र सेवक, पुणें.

**तबला सोलोवादन**:—श्री. मधु-कर ठाणेदार, पुणें.

**नाट्य प्रयोग**:—(स्वर्गावर स्वारी) श्री. सिद्धारूढ प्रासादिक नाट्य कला मंडळ, मुंबई.

**नृत्यकला**:—श्री. के. के. शेट्टी व कु. रूपमती, मुंबई. कु. पुष्पलता ना. आरगेकर कु. विमल ना. आरगेकर.

**गायन**:— श्री. अंजिनीबाई लोलये-कर, श्री. यशवंतराव लोलयेकर, मुंबई. कु. सिंधू शिरोडकर. श्री. चंद्रकांत शिरोडकर. श्री. गजानन त्रिंबक फडे, पाचोरे (बासरी वादन) श्री. रामचंद्र

# एका म्हातारीचें महत्कार्य !

एक राजा होता. त्यानें एका टेकडीवर मंदिर बांधण्याचें ठरविलें. लोकांनीं आपला गौरव **धर्मात्मा** म्हणून करावा, अशी त्याची इच्छा होती. टेकडीवर दगड नेण्याचें काम बैलांनीं केलें इमारत तयार झाली. उद्‌घाटनाचा दिवस जवळ आला. इमारतीचे उद्‌घाटनाबरोबर राजाच्या पुतळ्याचाहि अनावरण-समारंभ होता. आपल्या पुतळ्याचें अनावरण होणार म्हणून राजाला मोठा अभिमान वाटला. राजाच्या पुतळ्यावरील पडदा जेव्हां दूर करण्यांत आला त्यावेळीं लोकांना व राजालाहि मोठें आश्चर्य वाटलें; कारण राजाचे पुतळ्याऐवजीं तेथें एका म्हाताऱ्या बाईची प्रतिमा लोकांना दिसली. 'ही म्हातारी कोण ?' राजानें विचारलें. या डोंगराखालीं राहणारी एक वृद्ध बाई आहे, असें सांगण्यांत आलें. 'ही मूर्ति कोणी घडविली' मूर्तिकाराला राजानें प्रश्न केला. 'महाराज मी माझ्या हातानें आपली मूर्ति घडविली व येथें बसविली. हा बदल कसा झाला हें मला समजत नाहीं,' शिल्पकारानें भीत भीत सांगितलें. राजानें मनांत विचार केला, ज्याअर्थीं परमेश्वरानें या म्हातारीस मानाचें स्थान दिलें आहे, त्याअर्थीं तिची या कामीं मोठी कामगिरी असली पाहिजे. म्हातारीला राजापुढें आणविलें. 'ही इमारत बांधण्याचे कामीं बाई तुम्हीं काय केलें ?' राजानें विचारलें. 'महाराज ! मी गरीब म्हातारी काय करणार ! दगड वाहून नेणाऱ्या बैलांचे पाय घसरूं नयेत म्हणून मी त्यांच्या पायाखालीं गवत टाकीत होतें.' राजा मनांत उमगला, 'मोठें मंदिर बांधण्यापेक्षां गरीब प्राण्यांचें दुःख हलकें करणें, हेंच परमेश्वराचे दृष्टीनें मोठें कार्य आहे.'

★

मंगेशकर, मुंबई. श्री. दत्तात्रय काशिनाथ ठले आवसरी. श्री. बळवंत दिनानाथ वेल्हाळ चेंबूर. श्री. बाळकृष्ण नाईक, धुळे. कु. कलावती जोशी, धुळे. कु चित्रलेखा सैद, बेलापूर. श्री. किसन बावरे, बेलापूर. श्री. यशवंतराव पवार मुंबई. श्री. मधुकर (दत्त प्रसादिक भजनी मंडळ, मुंबई.) श्री. दत्तकुमार कळसकर, मुंबई. श्री. दत्तात्रय केरकर, मुंबई. सौ. हेमाबाई साळवीत, भोपाळ. कु. प्रकाश श्रीधर उपासनी. श्री. सिताराम फातरफेकर, मुंबई. श्री. यशवंतराव केरकर (तबला) मुंबई. श्री. विनायकराव हारसे (फिडल) मुंबई श्री. भालचंद्र विठ्ठल देशमुख (तबला) श्री. आत्माराम म्हापसेकर, मुंबई. (फिडल) सौ. नीना शिंदे. श्री. अनंत शिंदे, श्री. नरेंद्रकुमार, मुंबई. श्री. आत्माराम पांडुरंग नारायणगावकर. मुंबई. श्री. व. अ. काळे, शिरवळ.

संयुक्त चिटणीस } द. व. राणे
सी. वी. वेलकर

—

# श्रीसाई संस्थानला मिळालेल्या देणग्या

जानेवारी ते मे १९५७ च्या दरम्यान श्रीसाई संस्थानला पुढीलप्रमाणें देणग्या मिळाल्या आहेत—

## इमारत–निधि

१) गोल्ड सोप कंपनी, मुंबई रु. १७४
२) श्री. डी. डी. रासने पुर्णे, ,, १६२
३) श्री. एन्. ए. परीख, लंडन ,, १०१
४) श्री. के. सी. पटेल, मुंबई ,, १००
५) श्री. टी एच्. अडवानी मुंबई, ,, ५००
६) श्री. एम्. के. सडेकर, बडोदें ,, ११२·२५
७) श्री. बी. एम्. टण्णा जामनगर ,, ८२·९६

## इस्पितळ निधि

१) श्री. बी. बी. दवे, मुंबई रु. १०१
२) श्री. सी. जी. पटेल, कंपाला ,, १५१

संयुक्त चिटणीस } डी. बी. राणे,
सी. बी वेलकर

# भक्तमंडळाचे सभासद

फेब्रुवारी–मार्च–एप्रिल १९५७ मध्यें श्रीसाईबाबा संस्थानच्या भक्तमंडळाचे जे नवे सभासद झाले त्यांचीं नांवें पुढील प्रमाणें :—

## पेट्रन

१) श्री. एम्. एस्. विद्वांस, मुंबई.

## आजीव सभासद

१) श्री. सोमाभाई काशीभाई पटेल, उमयी.
२) ,, शंकरराव पी. दांडेकर, मुंबई ४
३) ,, एस्. जी. हेबळे, मुंबई ७
४) श्रीमती कस्तुरबाई एम्. सेठ, अहमदाबाद.
५) श्री. आर्. एस्. शेट्टी, मुंबई ८
६) श्रीमती लीला दिनकर लिमये, पुणे २
७) श्री. शंकर भिकाजी मजलेकर, मुंबई ४
८) ,, मच्छाराम कानजीभाई पटेल, मगदल्ला
९) ,, ईश्वरलाल मच्छाराम पटेल, ,,
१०) ,, सहदेव सखाराम साटम, मुंबई २८
११) ,, परशुराम कृष्णराव सावंत, मुंबई ७
१२) ,, पी टी. मेहता, मुंबई ९
१३) श्री. चेट्टी व्ही. इम्बेरुमानार, मद्रास १०
१४) बी. पी. जनार्दनराव, सिकंदराबाद (द.)
१५) श्रीमती सत्यवती बिडथानपल्ली, सिकंदराबाद (द)
१६) रावसाहेब श्री. सी. के. दुर्वासुलु, सिकंदराबाद (द.)
१७) श्री. ए. एल्. पी. रॉय; हैदराबाद (द.)

## सामान्य सभासद

नवीन सामान्य सभासद मुंबई प्रांतांत १७९ आणि इतर प्रांतांत ५१ मिळून २३० इतकी नवी सभासद संख्या झाली.

डी. बी. राणे
सी. बी. वेलकर
संयुक्त–चिटणीस.